पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६६ ■ मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# ठाकरे बंधू उद्या करणार युतीची घोषणा – खा. संजय राऊत

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**मुंबई** : जागा वाटपावरून ठाकरे बंधूंमध्ये कोणताही विसंवाद नाही. दोन्ही पक्षाच्या युती घोषणेबाबत कुणी चिंता करू नये, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. '१०० टक्के ठाकरे बंधूंना १०० जागा मिळतील, युतीची घोषणा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येत बुधवारी दुपारी १२ वाजता करणार आहेत, अशी माहिती खा. संजय राऊत यांनी दिली.

कार्यकर्त्यांनी युती स्वीकारलेली आहे. मनसे आणि शिवसेना यांच्यात युतीविषयी संभ्रम नाही. दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. दोन्ही पक्षांकडून तशा सूचना गेल्या आहेत. कार्यकर्त्यांमधील मनोमिलन आम्ही स्वत: अनुभवत आहोत. ठाकरे बंधूंमध्ये युती झालेलीच आहे. जागा वाटपावर शेवटचा हात सोमवारी रात्री फिरला. आता राज आणि उद्धव ठाकरे यांनी जागावाटप आणि अन्य संदर्भात केवळ घोषणा करणे बाकी आहे, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केले.

पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांनी सांगितले की, घोषणा कधी करायची याबाबत आम्ही निर्णय घेऊ. उमेदवारी भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आम्हाला आता वेगाने काम करावे लागेल. नाशिक, पुणे, कल्याण-डोंबिवली, ठाणे, मीरा-भाईंदर येथेही जागावाटपाची चर्चा पूर्ण झालेली आहे. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याशी बोलून निर्णय घेतला जाईल, अशी माहिती संजय राऊत यांनी दिली.


### दोन्ही पक्षात जागावाटपावरून विसंवाद नाही

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे तसेच आम्ही सगळे एकमेकांच्या संवादात आहोत. जागावाटप झाल्याशिवाय कोणतीही युती जाहीर होत नाही. आमच्या सगळ्या प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. आम्ही दोन्ही पक्ष मनापासून एकत्र आहोत. दोन्ही पक्षात जागावाटपावरून कोणताही तणाव, रस्सीखेच, विसंवाद नाही, असे संजय राऊत यांनी ठामपणे सांगितले. वरळी येथे दोन भाऊ एकत्र आले, तेथेच युतीची घोषणा झाली. घोषणेबाबत अन्य कुणी चिंता करू नये, असा टोला संजय राऊत यांनी लगावला. तसेच महाविकास आघाडी तुटलेली नाही. महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काही निर्णय घ्यावे लागतात, असेही खा. संजय राऊत यावेळी म्हणाले.

# तेल्हारा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शिवानी थाटे यांची पोलिसात तक्रार !

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**तेल्हारा** : नगर परिषद निवडणुकीचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच निकाल उमेदवाराच्या मोबाईलवर संदेशाद्वारे पाठविण्यात आला. या प्रकारामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. ईव्हीएम मशीनमध्ये छेडछाड केल्यामुळेच हा निकाल आला असावा, असा आरोप नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शिवानी सचिन थाटे यांनी केला असून, या संदर्भात पोलीस स्टेशन तेल्हारा येथे २२ डिसेंबरला लेखी तक्रार दाखल केली आहे. या धक्कादायक प्रकारामुळे निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या प्रकरणी कोणती कारवाई होते याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.




# अद्याप कुणाशीही युती–आघाडी नाही !

## ॲड. प्रकाश आंबेडकरांची पत्रकार परिषदेत सावध भूमिका

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**अकोला** : नवरदेव तयार, मुली पाहण्याचा कार्यक्रमही सुरू, मुलगी पसंद आल्यानंतर लगीन लावू; काँग्रेससह इतर पक्षांसोबतच्या आघाडीबाबत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आजच्या पत्रकार परिषदेत सूचक विधान केले. तसेच अद्याप कुणाशीही युती-आघाडी झाली नसल्याचे स्पष्ट केले.

राज्यात प्रकाश आंबेडकर नेमकं कुणासोबत जाणार यावर सध्या मोठा सस्पेन्स आहे. एकीकडे मुंबई आणि नागपुरात आंबेडकर काँग्रेसशी आघाडी करणार असल्याच्या चर्चा आहे. तर आंबेडकरांनी राज्यात १२ ठिकाणी शिंदेंची शिवसेना आणि १० ठिकाणी अजित पवारांच्या राष्ट्रवादीशी आघाडीची चर्चा सुरू असल्याचे प्रकाश आंबेडकरांनी स्पष्ट केले होते. या पार्श्वभूमीवर अकोल्यातील पत्रकार परिषदेत प्रकाश आंबेडकरांनी एक सुचक आणि महत्वाचे विधान केले.

नवरदेव तयार आहे. मुली पाहण्याचाही कार्यक्रम सुरू आहे. नुसतं चहापाण्याच्या चर्चा आहेत. मुलगी पसंद आल्यानंतर लगीन लावू, असं म्हणत त्यांनी अद्याप कुणाशीही युती-आघाडी झाली नसल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, आम्ही राज्यभर डेडलाईन देऊ शकत नाही, असं ते म्हणालेत. तर मुंबईचं सांगता येत नाहीये. कारण, आघाडी जाहीर करा म्हणलं तर थांबा म्हणतात. आज काँग्रेस राष्ट्रवादी एकत्र जात नाहीये. त्यामुळे आम्हाला निर्णय घ्यायचा आहे कुणासोबत जायचं. काँग्रेससोबत मुंबईत अद्याप जागा वाटपावर बोलणी सुरू झाली नाही. मात्र, ५० टक्के जागा वाटपांवर आम्ही ठाम असल्याचं ते म्हणालेय. कारण, आम्ही नगरपालिकेत काय आहोत, ते दिसलेय. दुसरीकडे आम्ही मुंबईत २०० जागांवर आमची तयारी आहे, असं मोठं विधान प्रकाश आंबेडकरांनी केलंय. आमचा आग्रह ५०-५० टक्के जागांचा असल्याचंही ते म्हणालेय.

# भीषण अपघातात तिघे ठार ,दोघे गंभीर जखमी

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**खामगाव** : धरणगाव- धुपेश्वर मार्गावर कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात तीन जण ठार तर दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी घडली. या घटनेने शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. शहरातील पाच युवक मारुती अर्टीगा क्र. एमएच १२ जेसी ७५०८ ने धुपेश्वरकडे जात होते. दरम्यान धरणगाव- धुपेश्वर दरम्यान वाहन चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरदार आदळली. ही धडक एवढी भीषण होती की यामध्ये गाडीतील रूद्र उमेश पवार (वय १९) रा.सावजी फाईल व विनायक जनार्धन अत्तरकार (वय २०) रा.लक्ष्मीनगर हे दोघे जागीच ठार झाले. तर गंभीर जखमी गणेश दीपक इंगळे यांचा उपचारादरम्यान अकोला येथे मृत्यू झाला. प्रशांत राजू वनारे, तक्ष धुरंधर या दोन जखमींवर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच मलकापूर येथील अनेकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. शहर पोलिस निरीक्षक गणेश गिरी हे सुध्दा पोलिस ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले.

जखमींना पोलिस व उपस्थितांच्या मदतीने तातडीने उपचारार्थ मलकापूर येथील रूग्णालयात हलविण्यात आले होते.



















जाहिरात संकलन : प्रतिक कुऱ्हेकर तालुका प्रतिनिधि मुर्तिजापूर मोबा.नं.9766018571

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# गॅस गळती रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाचे 'मॉकड्रिल'

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अमरावती :** कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनामार्फत आज लोणी येथील अदानी टोटल गॅस सीएनजी (भागवत पंप) केंद्रावर 'सुरक्षा लेव्हल-३ मॉकड्रिल'चे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही रंगीत तालीम पार पडली. या मॉकड्रिलमध्ये गॅस गळतीसारखी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास घ्यावयाची खबरदारी, सायरन वाजवून धोक्याची सूचना देणे, प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब करणे आणि बाधितांना त्वरित प्रथमोपचार देऊन सुरक्षितस्थळी हलवणे या बाबींचे प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले. अदानी टोटल गॅसच्या तांत्रिक पथकाने या वेळी आपत्कालीन नियोजनाचे बारकावे समजावून सांगितले.

# उमेद-पंख-विश्वासाचे उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी दिव्यांगाना जयपूर फुटचे वितरण

## ◆ सामजिक बांधिलकी जोपासणारा उपक्रम - हेमंत काळमेघ

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**अमरावती:** समाजामध्ये रुग्ण सेवेला अनन्य साधारण महत्व आहे. दिव्यांगांना केली जाणारी मदत ही ईश्वर चरणी अर्पण केलेली सेवा आहे. अश्या प्रकारचे उपक्रम सामाजिक बांधिलकी जोपासतात असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारीणी सदस्य श्री. हेमंत काळमेघ यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून 'उमेद-पंख-विश्वासाचे' या सामाजिक उद्देशाने दिव्यांग बांधवांसाठी निशुल्क जयपुर फुट वितरणाचा उपक्रम दिनांक १८ ते २७ डिसेंबर या कालावधीत डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे) आणि दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. निःशुल्क कृत्रिम अवयव वाटपाच्या आज दुस-या दिवशी एकुण १० दिव्यांगांना जयपूर फुटचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्रा. सुभाषराव बनसोड, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मोहोड, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोलाचे डॉ. किशोर मालोकार, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मनियार, दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशनच्या अध्यक्ष आर्टिस्ट रजनी अंबादे, आकाश अंबादे, दानदाते दिपकजी चांडक, सौ. अनिताताई चांडक, प्रभजीत सिंह बच्छेर, मानद सचिव, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अकोला, कृषी उत्पन्न बाजार समिती अकोलाचे संचालक चंदूभाऊ खेडकर, उमेद-पंख-विश्वासाचे जयपूर फुट वितरण समन्वयक संदिप पुंडकर, माजी जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी प्रकाश गवळी, डॉ. विनीत कौर, कौन्सिलर, सायकोथेरेपिस्ट, यांची उपस्थिती होती. दानदाते दीपक जी चांडक यांनी या उपक्रमाबद्दल भरभरून कौतुक केले. समाजामध्ये अशा उपक्रमामुळे निराधारांना एक मायेचा आधार मिळतो.त्यांच्या जीवनात आशेचा किरण प्रज्वलित होतो. हे उपक्रम जीवनाला नवी दिशा देणारे ठरतात असे गौरव उद्गार असे त्यांनी काढले. अक्षय पाथ्रिकर, गौरव राऊत, राहुल लकडे यांच्यासह पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे या उपक्रमास विशेष सहकार्य लाभत आहे.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे डॉ. पंजाबराव देशमुख जयंतीनिमित्त व्याख्यानमाला



## ◆ आज मुक्तपत्रकार जयदीप हर्डीकर पहिले पुष्प गुंफणार

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अमरावती:** शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी 'डॉ.पंजाबराव देशमुख व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली आहे. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व कृषी विषयांवर आधारित ही व्याख्यानमाला दि.२३, २४ आणि २६ डिसेंबरला मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात होईल.

मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. हर्षवर्धन प्रतापसिंह देशमुख राहतील तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. नागपूर येथील अभ्यासक व मुक्तपत्रकार जयदीप हर्डीकर हे 'ग्रामीण भारतातील सद्यःस्थिती व आव्हाने' या विषयावर पहिले पुष्प गुंफतील. या व्याख्यानाचे संयोजन डॉ.पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था विनिमय केंद्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी केले आहे. या व्याख्यानमालेत बुधवार दि. २४ डिसेंबर २०२५ ला सायंकाळी ५ वाजता अविनाश पाटील, अध्यक्ष, विकासनामा फाउंडेशन, धुळे यांचे 'भारतीय संविधान व लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर सायंकाळी ५.०० व्याख्यान होईल. शुक्रवार दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता मुंबई येथील भाषा अभ्यासक व संशोधक डॉ. दीपक पवार हे 'महाराष्ट्र धर्म' या विषयावर व्याख्यान देतील. दि.२४ आणि २६ च्या व्याख्यानाचे आयोजन श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाने केले असून या व्याख्यानांचा विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष तथा व्याख्यानमाला आयोजन समितीचे अध्यक्ष ॲड. जे.व्ही.पाटील पुसदेकर व सचिव प्राचार्य डॉ. अंबादास कुलट यांनी केले आहे.

# नांदगाव पेठ येथे दाखल मंथन पाळणकर याच्या खुनाच्या गुन्ह्यातील ३ मुख्य आरोपींसह ७ जणांना अटक

## ◆ अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**अमरावती :** १९/१२/२०२५ रोजी पोलीस स्टेशन नांदगाप पेठ येथे फिर्यादी ओम रविंद्र पाळनकर वय १६ वर्ष रा. सातुर्णा, अमरावती यांनी तक्रार दिली की, त्यांचे भाउ मंथन रविन्द्र पालनकर वय १९ वर्ष रा. सातुर्णा, अमरावती याला जुन्या वादावरून आरोपी यांनी फिर्यादी यांचे भावारा वाळकी डॅम येथे बोलावुन मृतक यास डोक्यावर मानेवर व पाठीवर चाकुने वार करून जिवानिशी ठार मारले.

अशा फिर्यादीचे जबानी रिपार्ट वरून पोलीस स्टेशन नांदगाप पेठ येथे ४५०/२०२५ कलम १०३ (१), १९१ (२), १९१(३),१९०, ६१ (२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयातील आरोपी सुजल दिपक शर्मा वय २३ वर्ष रा. हीरा कॉलनी गोपाल नगर, अमरावती सुजल पुरुषोत्तम जायभाये वय२८ वर्ष रा. आदर्श नगर गोपाल नगर तसेच एक विधीसंघर्षीत बालक व दोन विधीसंघर्षीत बालीका यांना ताब्यात घेवुन तपास कामी पोलीस स्टेशन नांदगाव पेठ यांना दिले होते

तर पोलीस स्टेशन नांदगाव पेठ यांनी सदर गुन्हयातील आरोपी संतोष पांडुरंग गाते वय २४ वर्ष रा. शितला माता मंदिर जवळ, राजापेठ, अमरावती यास अटक केली होती. यातील आरोपीनां न्यायालया समक्ष हजर केले असता त्यांना दिनांक २३/१२/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे. सदर गुन्हयातील मुख्य आरोपी व त्यांचे साथीदार हे गुन्हा घडल्यापासुन फरार होते.

आज दिनांक २१/१२/२०२५ रोजी पो. नि. संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनिय माहीती प्राप्त करून गुन्हयातील फरार मुख्य आरोपी हर्षद उर्फ गुड्डु मनोज रामटेके, वय २१ वर्ष, रा. आदर्श नगर, गोपाल नगर अमरावती, यश नामेदवराव पन्नासे, वय २३ वर्ष, रा. जळका शहापुर, ह.मू. महाविचर नगर अमरावती यांना बाभूळगाव, जि. अकोला येथून ताब्यात घेतले आहे आज रोजी पर्यत झालेल्या तपासा दरम्यान असे निष्पन्न झाले आहे की, सदरचा गुन्हा हा ब-याच दिवसापासून आरोपींनी पुर्वनियोजन करून केला आहे. सदर गुन्हयातील कटात सामील असलेले आरोपी ओम जितेंद्र भलावी वय २२ वर्ष रा. टापर होस्टेलच्या मागे, अमरावती. आकाश गजानन तुपटकर वय २५ वर्ष रा. आदर्श नगर, गोपाल नगर, अमरावती. प्रतिक ज्ञानेश्वर देवुडकर वय २५ वर्ष रा. आदर्श नगर, गोपाल नगर, अमरावती. यांना अमरावती शहरातील विविध ठिकाणावरून ताब्यात घेण्यात आले आहे. नमूद सर्व आरोपी यांनी सदर गुन्हयाची कबूली दिली असून त्यांना पुढील तपासकामी पो. स्टे. नांदगावपेठ यांचे ताब्यात देण्यात आले आहे. सदर गुन्हयात आज रोजी पर्यंत एकूण ११ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी ८ आरोपी सज्ञान असून ३ आरोपी विधीसंघर्षीत आहेत. सदर गुन्हयात आणखीन आरोपी निष्पन्न झाले असून त्यांचे बाबत गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन नांदगावपेठ सखोल तपास करीत आहे.

### ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे

हर्षद उर्फ गुड्डु मनोज रामटेके, वय २१ वर्ष, रा. आदर्श नगर, गोपाल नगर अमरावती, यश नामेदवराव पन्नासे, वय २३ वर्ष, रा. जळका शहापुर, ह.मू. महाविर नगर अमरावती, ओम जितेंद्र भलावी वय २२ वर्ष रा. टापर होस्टेलच्या मागे, अमरावती, , आकाश गजानन तुपटकर वय २५ वर्ष रा. आदर्श नगर, गोपाल नगर, अमरावती, प्रतिक ज्ञानेश्वर देवुडकर वय २५ वर्ष रा. आदर्श नगर, गोपाल नगर, अमरावती. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय (गुन्हे) रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे) शिवाजी बचाटे यांचे नेतृत्वात संदीप चव्हाण पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा, दिनेश दहातोंडे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे. नांदगावपेठ यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेकडील व पो. स्टे. नांदगावपेठ कडील अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

# 'शुक्रतारा' काव्यसंग्रहाचे प्रकाशन



प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अमरावती :** डॉ. सतीश तराळ यांनी संपादित केलेल्या डॉ पंजाबराव देशमुख यांच्यावरील ८०कवींच्या कविता संग्रहाचे प्रकाशन मराठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर यांचे हस्ते व शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माननीय हर्षवर्धन देशमुख व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरेयांचे यांचे उपस्थितीत डॉ. पंजाबराव देशमुख विचार साहित्य संमेलनात संपन्न झाले. हे संमेलन मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात डॉ. सतीश तराळ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते .याप्रसंगी संमेलनाच्या स्वागताध्यक्ष प्राचार्य स्मिता देशमुख संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख प्राचार्य दिलीप काळे प्राचार्य वर्षा देशमुख डॉ सुभाष सावरकर आदी मंडळी उपस्थित होती. डॉ. आवलगावकर म्हणाले नव्या जुन्या ऐंशी कवींच्या कवितांमधून डॉ पंजाबराव यांच्या जीवनाचे विविध पैलू उलगडतात व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख आपल्याला होते. त्यांचे विविधांगी व बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन यातून होते. डॉ. सतीश तराळ यांनी लिहिलेली दीर्घ व अभ्यासपूर्ण प्रस्तावना हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे

# जिल्ह्यातील पर्यटनाला मिळणार 'होमस्टे'ची जोड; स्थानिकांना रोजगाराची संधी

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयाच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील पर्यटनाला नवी चालना देण्यासाठी 'होमस्टे' योजना आता अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे पर्यटकांना जिल्ह्याची संस्कृती जवळून अनुभवता येईल, तर स्थानिक नागरिकांना आपल्या घराच्या माध्यमातून उत्पन्नाचे साधन मिळेल, अशी माहिती पर्यटन संचालनालयाचे विभागीय उपसंचालक विजय जाधव यांनी दिली आहे. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे स्थानिक नागरिक त्यांच्या घरातील उपलब्ध खोल्या पर्यटकांच्या निवासासाठी अधिकृतपणे देऊ शकतील. यामुळे पर्यटकांना हॉटेलऐवजी स्थानिक परंपरा, खाद्यसंस्कृती आणि ग्रामीण जीवनशैलीचा अस्सल अनुभव घेता येईल. या उपक्रमाचा मोठा लाभ विशेषतः ग्रामीण आणि आदिवासी भागातील जनतेला होणार असून, त्यातून शाश्वत पर्यटन आणि स्थानिक रोजगार निर्मितीला बळ मिळणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक घरमालकांनी शासनाने निर्धारित केलेले निकष पूर्ण करून आपली नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत होमस्टेंना पर्यटन विभागामार्फत तांत्रिक मार्गदर्शन, प्रसिद्धी आणि विविध शासकीय योजनांचे लाभ प्राधान्याने दिले जातील. अमरावती विभागातील हॉटेल व्यावसायिक आणि नागरिकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन स्वयंपूर्ण व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नोंदणी प्रक्रियेसाठी इच्छुकांनी कमलेश नंदनवार (मो. क्र. ८९७५८४८९८७)किंवा श्रीमती उज्ज्वला काळे (मो. क्र. ८३७९०५८०६०) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# यशोदा ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सतर्फे अमरावती येथे प्रगत हृदय व फुफ्फुस उपचारांवर पत्रकार परिषद

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**अमरावती:** जागतिक दर्जाची रुग्णसेवा देण्यासाठी ओळखले जाणारे, व्घआणि ँमान्यताप्राप्त यशोदा ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स, हैदराबाद यांनी २१ डिसेंबर २०२५ रोजी अमरावती येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले. या परिषदेत हृदय व फुफ्फुस प्रत्यारोपण, थोरॅसिक शस्त्रक्रिया, क्रिटिकल केअर सेवा तसेच गुंतागुंतीच्या हृदयविकारांवरील प्रगत उपचारांबाबत माहिती देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला यशोदा ग्रुप ऑफ हॉस्पिटल्समधील चार ज्येष्ठ व नामवंत सल्लागार डॉक्टरांनी संबोधित केले. त्यांनी आपले वैद्यकीय अनुभव, अलीकडील उल्लेखनीय यश आणि अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगती याबाबत सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमास आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी तसेच स्थानिक वैद्यकीय समुदायाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.चार स्वतंत्र रुग्णालये, चार हार्ट इन्स्टिट्यूट्स, चार कॅन्सर इन्स्टिट्यूट्स, ४,००० हून अधिक खाटा, ६२ वैद्यकीय विशेषता आणि ६४६ तज्ज्ञ डॉक्टरांच्या बळावर यशोदा ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स भारतभर उच्च दर्जाच्या तृतीय व चतुर्थ स्तरीय आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.डॉ. भारत विजय पुरोहित, वरिष्ठ सल्लागार – इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी यांनी प्रगत हृदयविकार उपचारांबाबत माहिती दिली. यामध्ये पल्मोनरी एम्बोलिझममध्ये आपत्कालीन स्वरूपात रक्ताच्या गाठी काढण्याच्या प्रक्रियेचा समावेश होता. जीवघेण्या परिस्थितीत मोठ्या कॅलिबरच्या सक्शन उपकरणांचा वापर व त्याचे फायदे, तसेच हृदय प्रत्यारोपण आणि गुंतागुंतीच्या हृदय शस्त्रक्रियांबाबत त्यांनी आपले अनुभव मांडले. डॉ. विश्वेश्वरन बालसुब्रमणियन, वरिष्ठ सल्लागार – पल्मोनोलॉजी व स्लीप मेडिसिन यांनी यशोदा हॉस्पिटल्सने केलेल्या एका ऐतिहासिक कामगिरीची माहिती दिली. पॅराक्वॉट विषबाधेमुळे बाधित झालेल्या १२ वर्षांच्या मुलावर यशस्वीपणे द्विपक्षीय लोबर फुफ्फुस प्रत्यारोपण करण्यात आले. पॅराक्वॉट विषबाधेवरील सर्वात लहान रुग्णावर करण्यात आलेले हे जगातील पहिले फुफ्फुस प्रत्यारोपण असून, बाल फुफ्फुस प्रत्यारोपण क्षेत्रात यामुळे जागतिक स्तरावर नवा मानदंड निर्माण झाला आहे. याशिवाय त्यांनी अत्याधुनिक ब्रॉन्कोस्कोपिक प्रक्रिया, ँळेए, विशेष एअरवे हस्तक्षेप, स्लीप मेडिसिन, फुफ्फुसाच्या कर्करोगाचे निदान आणि प्रगत श्वसन क्रिटिकल केअर याबाबतही माहिती दिली. डॉ. मंजुनाथ बाले, वरिष्ठ सल्लागार – रोबोटिक सायन्स व थोरॅसिक सर्जरी यांनी सर्वसमावेशक फुफ्फुस व कार्डिओथोरॅसिक सेवांबाबत माहिती दिली.

# बांधकाम क्षेत्रातील तरुणांना इस्त्रायलमध्ये नोकरीची संधी

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अमरावती :** आंतरराष्ट्रीय स्तरावर नोकरीच्या शोधात असलेल्या सुशिक्षित तरुणांसाठी इस्त्रायल देशामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती आणि एनएसडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने इस्त्रायलमधील 'रिनोवेशन कन्स्ट्रक्शन' क्षेत्रात एकूण २६०० जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या संधीचा जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त श्रीमती प्रांजली बारस्कर यांनी केले आहे. या भरती प्रक्रियेअंतर्गत विविध तांत्रिक कामांसाठी पदसंख्या उपलब्ध आहे. यामध्ये प्रामुख्याने प्लास्टरिंग वर्क (हजार जागा), सिरेमिक टायलिंग (हजार जागा), ड्रायवॉल वर्कर (३०० जागा) आणि मेसन (३०० जागा) यांचा समावेश आहे. बांधकाम क्षेत्रातील अनुभव असलेल्या उमेदवारांसाठी परदेशात काम करण्याची ही उत्तम संधी आहे. इच्छुक उमेदवारांनी या रोजगाराच्या संधीचा लाभ

घेण्यासाठी maharestransinternational.com या संकेतस्थळावर जाऊन उपलब्ध माहितीचे अवलोकन करावे. अर्जासाठी दिलेल्या अधिकृत गुगल फॉर्मच्या लिंकवर आपली माहिती अचूक भरावी. अर्ज भरताना किंवा प्रक्रियेबाबत काही शंका असल्यास उमेदवारांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, उस्मानिया मस्जिद जवळ, डेपो रोड, अमरावती येथे प्रत्यक्ष भेट द्यावी.

# पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयात रोपवाटिका व्यवस्थापन व उत्पादन कौशल्य विकास प्रशिक्षण

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**अमरावती :** नव्य शैक्षणिक धोरणानुसार उच्चशिक्षण क्षेत्र आणि अभ्यासक्रमांतर्गत मूलभूत बदल झाले असून कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. स्पर्धेच्या युगात युवकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासह त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर करणे काळाची गरज असून त्यासाठी पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय येथे प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी उद्यानविद्या विभागांतर्गत रोपवाटिका व्यवस्थापन व शोभिवंत झाडांचे उत्पादन हा कौशल्य विकास शिक्षणक्रम राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी शोभिवंत झाडांची निर्मिती, विक्री तसेच अर्थशास्त्र या बाबत कौशल्य आत्मसात करत असून भविष्यातील कुशल व्यवसायिक उद्योजक या कृषी महाविद्यालयात घडत आहेत. पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयामध्ये प्रात्यक्षिकावर आधारित व कौशल्य विकासाच्या दृष्टीने अभ्यासक्रम राबविला जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये देखील आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे.

रोपवाटिका व्यवस्थापन व उत्पादन हा कौशल्य विकास अभ्यासक्रम उद्यानविद्या विभागाचे प्रा. डॉ. स्वप्नील ज्ञानेश्वर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे व उपप्राचार्य प्रा. नितेश चौधरी यांचे सहकार्य व मार्गदर्शन देखील विद्यार्थ्यांना मिळत आहे.

## सिटी न्यूज सुपरफास्ट खामगाव

# निवडणुकीच्या वादातून धमकी; ७ जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**खामगाव :** निवडणूकीच्या कारणावरुन मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी ७ जणांविरुध्द खामगाव शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना रोजी रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान घडली आहे.

स्थानिक माखरीया नगर भागात राहणाऱ्या सौ. कमल बाळू मोरे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की नगर परीषद निवडणुकीचा निकाल लागला.यामध्ये माझा मुलगा शाम याचा पराभव झाला. अशोक हट्टेल निवडून आले. त्यामुळे अशोक हट्टेल, विक्की हट्टेल, शुभम हट्टेल, हर्ष हट्टेल, केवल हट्टेल, दक्ष हट्टेल, सुनील हट्टेल रा.बाळापूरफैल यांनी संगनमत करून माझ्या घरासमोरुन विजयी मिरवणूक घेवून आले व माझ्या घरासमोर उभी असलेली गाडी काढण्यास सांगितले. त्यावेळी माझा मुलगा शुभम हा गाडी काढत असताना विक्की हट्टेल याने दरवाजाला लाथ मारली व अश्लिल भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी लोटपाट केली व जिवे मारण्याची धमकी दिली. अशा आशयाच्या तक्रारीवरुन उपरोक्त ७ जणांविरुध्द खामगाव शहर पोलिसांनी कलम २९६, २२३, १८९ सहकलम १३५ भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास खामगाव शहर पोस्टेचे ठाणेदार रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकों फासे करीत आहेत.

# पत्नीला अश्लिल शिवीगाळ करुन मारहाण

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**खामगाव :** पत्नीला अश्लिल शिवीगाळ करुन बेदम मारहाण केल्याची घटना स्थानिक बड़े प्लॉट भागात घडली, याबाबत पोलिसांनी पतीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक बड़े प्लॉट भागातील नजरानाबी जावेद खान (३५) या विवाहितेने शिवाजी नगर पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटल आहे की आरोपी पती जावेदखान बुढनखान यांनी अश्लिल शिवीगाळ केली व मारहाण करून जखमी केले. अशा तक्रारीवरून आरोपी जावेदखान विरुश्द कलम २९६, ११५ (२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास शिवाजी नगर पोस्टेचे ठाणेदार अहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com


## आचारसंहिता; शस्त्र वापरावर निर्बंध

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता पालिकेच्या संपूर्ण क्षेत्रात लागू असून, या कालावधीत शस्त्र वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हा दंडाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबतचा आदेश जारी केला. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ नुसार महापालिका सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत महापालिकेच्या संपूर्ण क्षेत्रातील शस्त्र परवानाधारकाला शस्त्र वाहून नेण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे. बँक, खेळाडू, सुरक्षारक्षक (खनिकर्म विभाग, बँक, कॅश व्हॅन) पीक संरक्षणार्थ आदींना वगळण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणा-यांवर दंडनीय कार्यवाही करण्यात येईल, असे आदेशात नमूद आहे.

## जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन द्वारे पेन्शनर्स डे निमित्त मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदान



प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनच्या वतीने पेन्शनर्स डे निमित्त मातोश्री वृद्धाश्रमातील ज्येष्ठ पुरुष व महिला सदस्यांना मिष्टान्न भोजन वितरित करण्यात आले याप्रसंगी अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सत्यनारायण बाहेती, उपाध्यक्ष रामभाऊ बिरकड, सचिव एकनाथराव उके, कार्यकारिणी सदस्य प्रा.किशोर बुटोले, प्रा. डॉ. देवकिसन बाहेती, साहेबराव काकड, दाते आदी सदस्य उपस्थित होते. त्यांनी आश्रमातील सर्व महिला भगिनी आणि पुरुष बांधवांशी तसेच तेथील कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. त्यांचे आरोग्य आणि इतर समस्यांबाबत चर्चा केली. आश्रमातील उत्कृष्ट व्यवस्था पाहून संचालकांचे कौतुक केले.

## सातवा वेतन आयोग व ग्रॅज्युएटीच्या थकबाकी करिता शिक्षक संघटनांची न्यायालयात धाव

**अकोला:** महाराष्ट्र राज्य प्राथ, शिक्षक संघ मनपा अकोला व महाराष्ट्र राज्य उर्दू प्राथ, शिक्षक संघ अकोलाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठात ७ वा वेतन आयोगाची थकबाकी व ७ वा वेतन आयोगाप्रमाणे ग्रॅज्युईटी संदर्भात धाव घेतली आहे.

निवृत्त शिक्षकांना लाभ मिळाला नाही. ७ वा वेतन आयोग केंद्र व राज्य कर्मचा-यांना १ जाने २०१६ ला लागु केला. मात्र मनपा अकोला प्रशासनाने तो प्रत्यक्ष १ सप्टेंबर २०२२ च्या वेतनामध्ये लागु केला. त्या नुसार १ जाने २०१६ ते ३० आक्टोंबर २०२१ पर्यंतच्या कालावधीतील ७ वा वेतन आयोगाची थकबाकी न देण्याचा ठराव मनपा अकोला प्रशासनाने घेतला. मनपाची आर्थिक स्थिती बघीतले असता तसेच वार्षिक अंदाज पत्रक बघितले असता शिलकीचे अंदाज पत्रक होते तरी सुद्धा आर्थिक स्थिती खराब कशी? मात्र आर्थिक अंदाज पत्रकावरून असे लक्षात येते की, आर्थिक स्थिती खराब नसुन प्रशासनाच्या नियोजनाचा अभाव आहे हे मात्र नक्की ! शिक्षक सेवानिवृत्त झाल्यानंतर वेतन अर्ध्यावर येते.

## जी- राम-जी कायदा मागे घ्या, महात्मा गांधींचे नाव बदलू नका- मागणी

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** केंद्रीय मंत्रीमंडळाने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नाव बदलून नवीन जी राम जी मिशन या नावाने योजना जाहीर केली आहे. त्यात १०० दिवस कामाचा हक्क काढून घेणार आहे. म्हणुन भारतीय कम्युनिस्ट पक्ष व डाव्या पक्षांनी २२ डिसेंबर रोजी देशव्यापी आंदोलन केले. त्याला पाठिंबा म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्ष व आयटक कामगार संघटना ऑल इंडिया युथ फेडरेशनच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शने करण्यात आली.

जी रामजी कायदा मागे घ्या तसेच गांधींजींचे नाव बदलू नका असे कामगार नेते नयन गायकवाड म्हणाले. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात २०० दिवस प्रति वर्ष व प्रतिदिन सातशे रुपये वेतन दिले पाहिजे असे म्हटले आहे. सदर आंदोलन हे इतर तालुक्यात सुद्धा झाले. आंदोलनात कॉम्रेड नयन गायकवाड, मायावती बोरकर, ज्योती ताथोड, सविता प्रधान, प्रिया वरोटे, राजकन्या बनसोड, चंदा शिंदे, पद्माबाई डोंगरे, संतु अंभोरे, कांचन घरडे, मेघा बोदडे, कल्पना जाधव, मंगला सिरसाट, मेहजबीन, आशा लिंगोट, ईश्वरी कळसकर, अजय ठाकरे उपस्थित होते.

## गंगा सोनोने यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करा, उप सचिवांचे निर्देश

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** येथील गंगा प्रदीप सोनोने यांनी त्यांच्या फसवणूक संदर्भात गृहमंत्र्यांना २८ नोव्हेंबर २५ रोजी उपोषणाबाबत अर्ज पाठवला होता. त्याची दखल घ्यावी असे पत्र शासनाच्या उपसचिव यमुना जाधव यांनी पोलिस अधीक्षकांना पाठवले आहे.

अर्जदारांनी त्यांच्यासोबत झालेल्या फसवणुकी प्रकरणी ०१.०५.२०२५ रोजी पोलीस स्टेशन, खदान येथे तक्रार अर्ज दिला होता. परंतु दखलपात्र गुन्हाची तक्रार असून देखील खदान, पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला नाही. तसेच उपोषणाचा इशारा दिल्यानंतर ०३.११.२०२५ रोजी गुन्हा दाखल केला परंतु उचित कार्यवाही करण्यात आली नसल्याचे तक्रार अर्जात नमुद करण्यात आले आहे. तसेच संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक केदारे, तसेच अंमलदार यांनी उशिराने गुन्हा दाखल केला असुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची विनंती शासनास सादर तक्रार अर्जान्वये करण्यात आली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या मुळ तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही न झाल्याने १९.१२.२०२५ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषणास बसले आहे.

या प्रकरणी अर्जदारांशी आपण चर्चा केली असता त्यांच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सत्वर उचित कार्यवाही करण्याकरिता शासन स्तरावरुन पोलीस अधीक्षक, अकोला यांना सुचना देण्यात येईल, अशी माहिती दिल्यानंतर अर्जदाराने उपोषणाचा निर्णय मागे घेतला आहे. प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेता या प्रकरणी दाखल गुन्याच्या अनुषंगाने तत्काळ योग्य चौकशी करुन उचित कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास अवगत करण्यात यावे, असे पत्रात म्हटले आहे.

## विसर्जन कुंडांच्या देखभालीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** अनंत चतुर्दशीला गणेश विसर्जन झाल्यावर विसर्जन कुंडाकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष दिसते. शहरातील निमवाडी आणि कोतवाली येथील मोर्णा नदी परिसरात भाविकांची होणारी मोठी गर्दी लक्षात घेऊन कृत्रिम विसर्जन घाट तयार करण्यात आले होते. सिटी कोतवाली परिसरातील मोर्णा नदीच्या काठावर मोठे खोल खड्डे खोदून पाच-सात कुंडांना आकर्षक रूप देऊन विसर्जन घाट सज्ज करण्यात आले होते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर विसर्जन पार पडले.

मात्र, तीन महिने उलटून गेल्यानंतरही आजवर अकोला महानगरपालिकेच्या संबंधित विभागाचे लक्ष नाही. विशेष म्हणजे, निमवाडी येथे बनवण्यात आलेले विसर्जन कुंड मातीने बुजवून बंद करण्यात आले आहेत; परंतु शहराच्या मध्यभागी असलेल्या अतिशय गजबजलेल्या गणेश घाट परिसरातील कुंडांची ना स्वच्छता केली जात नाही. किंवा त्यावर झाकण ठेवले नाही.

इतकेच नाही तर, या कुंडांमध्ये अजूनही अनेक लहान-मोठ्या गणेश मूर्ती



पडून होत्या. मनपा कर्मचाऱ्यांनी पाच-सात दिवसांपूर्वीच या मूर्ती बाहेर काढून नेल्याची माहिती परिसरातील एका नागरिकाने (कॅमेऱ्यासमोर न येण्याच्या अटीवर) दिली आहे. विशेष बाब म्हणजे, लाखो रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या या विसर्जन घाटाची योग्य देखभाल केली, तर भविष्यात हेच कुंड विसर्जनासाठी पुन्हा वापरता येऊ शकतात. मात्र, संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करत असून हे कुंड ना बंद करत आहे, ना त्यांची निगा राखत आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वीच अकोला महानगरपालिका प्रशासनाने या गणेश घाटाकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## हिवरखेड नगरपरिषद पहिल्या निवडणुकीत राबलेली प्रशासकीय टीम




प्रतिनिधी २३ डिसेंबर

**हिवरखेड:** नगरपरिषदेच्या पहिल्या निवडणुकीकरिता प्रशासकीय टीमची भूमिका महत्त्वाची ठरली. हिवरखेड पोलिस, अकोट, अमरावती, अकोला, पोलिसांनी सुद्धा मतमोजणीच्या वेळी कडकोट बंदोबस्त ठेवला होता. नगर परिषद स्थापनेनंतर पहिलीच निवडणूक असल्याने याकडे लक्ष लागले होते.

## सुशासन सप्ताहानिमित्त आज कार्यशाळा

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** जिल्हा प्रशासनाकडून १९ ते २४ डिसेंबरदरम्यान सुशासन आठवडा साजरा करण्यात येत असून, उद्या (दि. २३) सकाळी ११ वा. नियोजनभवनात कार्यशाळा होणार आहे.

सर्व यंत्रणांचे अधिकारी- कर्मचारी यांना उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## संत सेना मंदिरात गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त भजन संध्या



प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** शहरातील डाबकी रोड परिसर येथील संत सेना महाराज मंदिरात नुकतीच वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य भजन संध्येचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा लाभ परिसरातील शेकडो नागरिकांनी घेतला.

डाबकी रोड परिसरातील संत सेना महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैराग्यमूर्ती संत गाडगे महाराज पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात आला. पुण्यतिथीनिमित्त आयोजित भव्य भजन संध्येत प्रसिद्ध तबलावादक डॉ. देवेंद्र यादव, लांडे सर आणि अंबुसकर सर यांनी एकापेक्षा एक सरस भजने सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. भजन कार्यक्रमानंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते, ज्याचा लाभ परिसरातील शेकडो भाविकांनी घेतला.

## बाळापुरात धावत्या कारला आग

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**बाळापूर :** शहरातील अंजुमन रोडवर भरवस्तीत २२ डिसेंबर रोजी सायंकाळी धावत्या कारला अचानक आग लागली. एमएच-२८-व्ही-२२६० क्रमांकाच्या कारला आगीने वेढा दिला. कारमध्ये गॅस सिलिंडर असल्याची माहिती मिळताच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही वेळातच सिलिंडरचा स्फोट झाल्याने आगीने रौद्र रूप धारण केले. आगीचा दाट धूर दूरवर पसरला. घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक प्रकाश झोडगे आपल्या कर्मचाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. नागरिकांच्या सहकार्याने आसपासची माती वापरून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. दरम्यान, अग्निशमन दलाची छोटी गाडी उपलब्ध असतानाही वेळेवर न पोहोचल्याचा आरोप होत आहे. एक तासानंतर आग आटोक्यात आली. पारस येथून आलेली मोठी अग्निशमन गाडी अरुंद रस्त्यामुळे घटनास्थळी पोहोचू शकली नाही. बेकायदेशीर गॅस किटमुळेच ही घटना घडल्याचा प्राथमिक संशय असून, पोलिस तपास करीत आहेत.




सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801


## पातूरच्या किड्स पॅराडाईज स्कूलमध्ये रंगला शपथ विधी सोहळा

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**पातूर :** एकीकडे महाराष्ट्रात सत्ताधाऱ्यांचे नाराजी नाट्य सुरु आहे. कुरघोडीचे राजकारण चर्चेचा विषय बनले आहे, अशातच पातूरमध्ये आगळा -वेगळा शपथविधी सोहळा रंगला. या प्रतिकात्मक कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांसह वीस मंत्र्यांना राज्यपाल यांनी शपथ दिली. किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या शालेय मंत्रिमंडळाचा अगदी खरा - खुरा वाटावा असा दिमाखदार सोहळा उत्साहात पार पडला.

या सोहळ्याला अध्यक्ष म्हणून जेष्ठ पत्रकार तथा रेणुका माता संस्थानचे अध्यक्ष शंकरराव नाभरे होते तर ठाणेदार हनुमंत डोपेवाड, शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे, कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून शाळेच्या संविधान फलकाचे उदघाट्न करण्यात आले.

आलेल्या पाहुण्यांना स्काऊट-




गाईडच्या पथकाने दिलेली मानवंदना आकर्षण ठरली.

तदनंतर शपथ विधी सोहळ्याची सुरवात झाली. यावेळी प्रास्ताविक शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे यांनी केले. तर ठाणेदार हनुमंत डोपेवाड व शंकरराव नाभरे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. अशा उपक्रमातून आदर्श राजकारणी घडतील असा अशावाद त्यांनी व्यक्त केला.

यानंतर राज्यपाल असलेल्या इयत्ता दहावीची विद्यार्थिनी अमृता शेंडे हिने शालेय मंत्रिमंडळातील वीस मंत्र्यांना शपथ दिली. यामध्ये मुख्यमंत्री अंकित पाटील, उपमुख्यमंत्री रितेश घुगे, गृहमंत्री नमिशा सुगंधी, अर्थमंत्री मनस्वी सपकाळ, शिक्षणमंत्री सलोनी खोडे, कृषीमंत्री अझहफ खान, सांस्कृतिक मंत्री दिव्या बंड, क्रीडामंत्री रिद्धी उगले, आरोग्यमंत्री संभाजी हिरळकार, पर्यावरण मंत्री ओम फाटकर, जलसंपदा मंत्री संग्राम इंगळे यांना तर पालकमंत्री म्हणून श्राव्या गवई, छत्रपती पाटील, आएरा खान, गीत येवले, कनिष्का खंडारे, स्पंदन गाडगे, वीरा बारताशे, मानस शेंडे, हिंदवी बोचरे आदींनी मंत्रिपदाची आणि गोपनीयतेची शपथ घेतली. राज्यपालचे सेवक म्हणून युवराज अमानकर व गौरव अमानकर यांनी काम पहिले तर सान्वी पाटील व आदित्य पाटील यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला. सोहळ्याचे संचालन श्रावणी गिऱ्हे हिने केले तर आभार मनस्वी जाधव हिने मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

## स्व. सुगनचंद सुखदेव तापडिया विद्यालयाचे सुयश

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** सुशिलाबाई देशमुख विद्यालय उमरी येथे नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये स्थानिक शिवर स्व. सु. सु.तापडिया विद्यालय माध्यमिक गटाच्या डिझास्टर मॅनेजमेंट या मॉडेलला प्रथम क्रमांक प्राप्त झाला. यात सहभागी विद्यार्थी कु .गौरी कातांगळे व आदर्श गवई तर प्राथमिक गटातील लोकेश कळसकर आणि कु.मानवी दारोकार यांचे मॉडेल सहभागी होते. या प्रदर्शनासाठी



विज्ञान शिक्षक जाधव, बेलोकार आणि कावकर यांनी विशेष मेहनत घेतली होती. शाळेच्या मुख्याध्यापिका गोसावी मॅडम यांच्या मार्गदर्शनाने आणि शाळेतील इतर शिक्षकांच्या सहकार्याने हे यश संपादन करण्यात शाळेला यश मिळाले.

## भ्रातृमंडळ अकोलाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** भ्रातृमंडळ रणपिसे नगर या सामाजिक संस्थेचे वार्षिक स्नेहसंमेलन तथा सांस्कृतिक कार्यक्रम रविवारी खंडेलवाल भवन येथे अत्यंत आनंदात झाला.

उद्घाटनप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. पाहुणे भास्कर चांगो पाटील यांचा सत्कार करण्यात




आला. परंपरेनुसार जेष्ठ नागरिकांचे सपत्नीक सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अकोला पूर्व चे मा. आमदार श्री रणधीर भाऊ सावरकर यांचे स्वागत मंडळाध्यक्ष डॉ. एम. एन. पाटील यांनी केले. तसेच प्रमुख पाहुणे भाजप महानगर अध्यक्ष जयंत भाऊ मसने यांचे स्वागत मंडळ उपाध्यक्ष प्रा. राजीव इंगळे यांनी केले. सामाजिक बांधिलकी आणि बंधुभाव जपण्यासाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात येत असते. सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीच आनंद लुटला. सर्व मंडळ पदाधिकारी, सदस्यगण आणि महिलामंडळाच्या अथक परिश्रमाने पार पडलेल्या कार्यक्रमास निमंत्रित परिवारांची लक्षणीय उपस्थिती होती. सादरकर्त्यांना बक्षीसे देण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५

## २५ डिसेंबरला दीनदयालच्या विवेकानंद छात्रावासाचा पालक मेळावा

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**यवतमाळ :** येथील पारधी व शेतकरी विकासासाठी कार्यरत दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या विवेकानंद छात्रावासाचा पालक मेळावा गुरुवार, दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता यवतमाळात आयोजिला आहे. पारधी बांधवांना विकासाच्या मुख्य धारेत आणण्यासाठी १९९७ पासून शिक्षा, स्वास्थ्य, संस्कार व स्वावलंबन या चतु:सूत्रीवर विवेकानंद छात्रावास चालविला जातो. त्यातून आजवर साडेपाचशेहून अधिक विद्यार्थी शिकून विविध क्षेत्रात व्यवसाय करीत आहेत. या छात्रावासाचा पालक मेळावा येथील जांब रोडवरील विवेकानंद छात्रावासात आयोजित करण्यात आला असून त्यास मुख्य अतिथी म्हणून संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांत अध्यक्ष कांचनताई गडकरी तर अध्यक्ष म्हणून रेमंड युको डेनिम चे डायरेक्टर नितीन

# यवतमाळला 'स्मार्ट सिटी' बनवणार !

## सीबीएसई शाळा, डिजिटल ॲप व पारदर्शक कारभार

**नवनिर्वाचित नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके यांचे व्हिजन**

प्रतिनिधी २३ डिसेंबर

राहुल वासनिक

**यवतमाळ :** यवतमाळ शहराचा सर्वांगीण विकास साधत यवतमाळला 'स्मार्ट सिटी'च्या दिशेने नेण्याचा ठाम संकल्प यवतमाळ नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी खास मुलाखतीत व्यक्त केला आहे. शिक्षण, पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि डिजिटल प्रशासन या प्रमुख बाबींवर भर देत त्यांनी आगामी कार्यकाळाचा विकासाचा अजेंडा मांडला आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने नगराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ॲड. उईके यांनी शहरातील नगर परिषद शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्ननुसार इंग्लिश मीडियम शिक्षण सुरू करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय जाहीर केला. विशेषतः गोरगरीब आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार, स्पर्धात्मक आणि आधुनिक शिक्षण मिळावे, यासाठी नगर परिषद स्तरावर ठोस प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षण हा दीर्घकालीन विकासाचा पाया असल्याचे सांगत, त्यातूनच यवतमाळचा भविष्यकाळ घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



शहर प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतिमान करण्यासाठी नगर परिषदेचे स्वतंत्र मोबाईल ॲप सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. हे ॲप यवतमाळच्या नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार असून, शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता किंवा इतर नागरी समस्यांच्या तक्रारी थेट ऑनलाईन करता येणार आहेत. नागरिकांनी फोटोसह तक्रार अपलोड केल्यानंतर तात्काळ त्यावर कार्यवाही केली जाईल. संबंधित कर्मचारी थेट घटनास्थळी पोहोचून समस्या सोडवतील, असे त्यांनी सांगितले. या डिजिटल व्यवस्थेमुळे तक्रार निवारण प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि परिणामकारक होईल, असा त्यांचा विश्वास आहे.

महिलांच्या सोयी-सुविधांवर विशेष भर देत ॲड. उईके यांनी शहरातील बाजारपेठा तसेच संपूर्ण यवतमाळमध्ये महिलांसाठी आणि पुरुषांसाठी स्वतंत्र सार्वजनिक शौचालये उभारण्याचा निर्णय जाहीर केला. सध्या महिलांसाठी पुरेशा सुविधा नसल्याने मोठी गैरसोय होते. ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी नगर परिषद नियोजनबद्ध पद्धतीने काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पायाभूत सुविधांबाबत बोलताना पाण्याचा प्रश्न आणि रस्त्यांची दुरवस्था ही शहरासमोरील मोठी आव्हाने असल्याचे त्यांनी नमूद केले. सिमेंट काँक्रीट रस्ते बांधण्यावर भर देण्यात येणार असून, अर्धवट राहिलेली किंवा रखडलेली विकासकामे प्राधान्याने पूर्ण केली जातील. या सर्व कामांवर विशेष लक्ष ठेवण्यासाठी नगर परिषद स्तरावर स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. नगर परिषदेच्या कामकाजात पारदर्शकता राखण्यासाठी सर्व विकासकामे ऑनलाईन पद्धतीने स्क्रुटिनीखाली ठेवली जातील. कोणते काम कुठपर्यंत पोहोचले आहे, याची माहिती नागरिकांनाही उपलब्ध होणार आहे. यामुळे प्रशासन आणि नागरिकांमधील विश्वास अधिक दृढ होईल, तसेच नगर परिषद अधिक जोमाने आणि जबाबदारीने काम करेल, असा विश्वास नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांनी व्यक्त केला. आगामी काळात त्यांच्या या व्हिजनची अंमलबजावणी प्रत्यक्षात कशी होते, याकडे यवतमाळकरांचे लक्ष लागले आहे.




## डोंगरखर्डा येथे खुलेआम मटका अड्डे सुरु

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**कळंब :** कळंब तालुक्यातील डोंगर खर्डा येथे गेल्या दोन-तीन वर्षांपासून राजरोसपणे मटका अड्डा सुरू असल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे. कळंब पोलीस स्टेशन हद्दीत येणारे डोंगर खर्डा हे तालुक्यातील मोठे गाव असून परिसरातील दहा-बारा खेड्यांचा या गावाशी नेहमीचा संपर्क असतो. त्यामुळे हा भाग कायम गजबजलेला असतो. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत मटका चालकांनी खुलेआम आपले अड्डे सुरू केल्याचे चित्र आहे.

बसस्थानक परिसर व मुख्य रस्त्यालगत मटका दुकाने थाटण्यात आली असून त्यामुळे रस्त्यावरून शेतात ये-जा करणाऱ्या महिला वर्गाला मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मात्र, एवढे होत असतानाही संबंधित यंत्रणेकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे "या मटका अड्ड्यांना नेमका कुणाचा आशीर्वाद आहे?" असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. मटका अड्ड्यांवर कारवाई न झाल्याने सामान्य नागरिक तक्रार करण्यासही धजावत नसल्याची परिस्थिती आहे. या बेकायदेशीर धंद्यामुळे परिसरातील युवक व्यसनाधीन होत असून सामाजिक वातावरणही बिघडत आहे. त्यामुळे माननीय पोलीस अधीक्षक यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी डोंगर खर्डा परिसरातील नागरिकांकडून होत आहे.



## ३३ हजार वीज ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**यवतमाळ :** वीज ही अत्यावश्यक सेवा असतानाही परिमंडळातील हजारो वीज ग्राहक वीजबिल भरण्यास चालढकल करीत असल्याने महावितरणला नाईलाजास्तव धडक मोहिम राबवावी लागली आहे. या मोहिमेअंतर्गत ३९ कोटी ५३ लाख रुपयांच्या थकबाकीसाठी अमरावती परिमंडळातील लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर वर्गातील ३३ हजार ८४५ वीज ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

महावितरण ही वीज निर्मिती करणाऱ्या कंपन्यांची ग्राहक असल्याने वेळेत देयके अदा करण्यासाठी दरमहा शंभर टक्के वीजबिल वसुली होणे आवश्यक आहे. मात्र मोठ्या प्रमाणात ग्राहक वीजबिल भरण्यास प्राधान्य देत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही अनेक वेळा प्रतिसाद दिला जात नसल्याने थकबाकीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. डिसेंबर महिन्याचे २२ दिवस पूर्ण होऊनही वीजबिल वसुली ही केवळ डिसेंबर डिमांडच्या ६२ टक्के आणि एकूण थकबाकीच्या २८ टक्के इतकीच झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी विभागनिहाय आढावा घेऊन थकीत वीजबिल वसुलीसोबतच थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

वीजपुरवठा खंडित करताना संबंधित कारवाई करून त्याची ऑनलाईन पोर्टलवर नोंद करणे बंधनकारक असल्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या आहेत.

## हमाली करणारा युवक थेट नगरसेवक

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**ढाणकी :** नशिबाचे चक्र कधी, कसे फिरेल हे कुणालाही सांगता येत नाही. कष्ट, प्रामाणिकपणा आणि लोकांचा विश्वास यांची साथ लाभली, तर सामान्य माणूसही असामान्य यश मिळवू शकतो, याचे जिवंत उदाहरण ढाणकी शहरात पाहायला मिळाले आहे. ढाणकी येथील हमाली करणारा युवक रविशंकर गुणाजी ढोबळे थेट नगरसेवक म्हणून निवडून आला असून, त्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

घरची परिस्थिती अत्यंत बेताची. वडीलही हमालीचेच काम करत असल्याने कुटुंबाचा डोलारा सांभाळण्याची जबाबदारी लहान वयातच रविशंकरच्या खांद्यावर आली. शिक्षण मर्यादित असल्याने इतर रोजगाराच्या संधी उपलब्ध नव्हत्या. मात्र परिस्थितीसमोर हार न मानता सन्मानाने हमालीचे काम स्वीकारून त्याने कष्टाची वाट धरली. प्रामाणिकपणा, शांत स्वभाव आणि प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती हेच रविशंकरचे खरे भांडवल ठरले. टेंभेश्वर नगर परिसरात तो सर्वपरिचित झाला. सामान्य नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा हा युवक नागरिकांच्या मनात घर करून गेला. ढाणकीच्या राजकारणात नव्याने प्रवेश केलेल्या शिवसेना (शिंदे गट) ने नगरपंचायत निवडणुकीत नवयुवकांना संधी देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार रविशंकर ढोबळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. पक्षापेक्षा व्यक्तिमत्त्वाला महत्त्व देत नागरिकांनी त्यांना भरभरून पाठिंबा दिला आणि मोठ्या मताधिक्याने नगरसेवक म्हणून निवडून दिले. निवडीनंतरही रविशंकर ढोबळे यांनी नम्रपणे प्रतिक्रिया देताना, "मी हमालीचे कामही प्रामाणिकपणे करत राहीन आणि जनसेवा हीच माझी खरी ओळख कायम राहील," असे सांगितले. कष्टातून यशाकडे गेलेली ही वाटचाल आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## सतपल्ली येथे समाजप्रबोधन कार्यक्रम

प्रतिनिधी २३ डिसेंबर




**झरी :** महामाया बुद्ध विहार कमिटीच्या वतीने भारतीय संविधान अमृत महोत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, भीमाई निर्वाण दिन व संत गाडगे महाराज पुण्यतिथीनिमित्त संयुक्त समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. २०) सतपल्ली येथे करण्यात आले. या कार्यक्रमास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमानिमित्त गावातून भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी भीमसैनिकांनी हातात झाडू घेऊन गाव स्वच्छता करत सामाजिक जाणीव जागृतीचा संदेश दिला. महाराष्ट्रातील प्रसिद्ध कव्वाल विकास राजा (नागपूर–काटोल) यांनी आपल्या समाजप्रबोधनपर कार्यक्रमातून उपस्थितांना प्रेरणादायी संदेश दिला.

कार्यक्रमाला तहसीलदार अक्षय रासने व पोलीस निरीक्षक स्वप्नील ठाकरे प्रमुख उपस्थित होते. यावेळी विश्वजित कांबळे, श्यामराव मुनेश्वर व प्रवीण गांजरे यांनी समाजप्रबोधनपर मार्गदर्शन केले. या प्रसंगी बुद्ध मूर्तीचे लोकार्पण करण्यात आले. समाजकार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच विहार सौंदर्यीकरण करणारे चित्रकार प्रशांत निमसरकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या डिजिटल फ्लेक्सचे उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जितेंद्र निमसरकर यांनी केले, तर सूत्रसंचालन अजय निमसरकर यांनी केले. कार्यक्रमास परिसरातील ग्रामस्थ, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुलींनी आरोग्यासोबतच सुरक्षिततेबाबत जागृत राहणे काळाची गरज : डॉ. स्नेहा भुयार

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**यवतमाळ :** आजच्या धावपळीच्या युगात किशोरवयीन मुलींसमोर शारीरिक बदलांसोबतच सामाजिक आव्हानेही वाढत आहेत. या बदलांना सकारात्मकतेने सामोरे जाण्यासाठी आरोग्य व सुरक्षितता या दोन्ही आघाड्यांवर मुलींनी सक्षम होणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन यवतमाळ येथील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्नेहा भुयार यांनी केले.

स्थानिक स्व. देवराव पाटील विद्यालय, वडगाव रोड येथे शुक्रवार (दि. १९) रोजी 'सखी सावित्री समिती' व 'विशाखा समिती' यांच्या संयुक्त विद्यमाने किशोरवयीन विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात डॉ. स्नेहा भुयार प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका आशा गिरी होत्या.

डॉ. भुयार यांनी अतिशय ओघवत्या व समजण्यास सोप्या भाषेत विद्यार्थिनींना आरोग्य, आहार, मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम, भावनिक व लैंगिक सुरक्षितता याबाबत सखोल मार्गदर्शन केले. मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेचे महत्त्व, सकस आहार, शरीरातील लोहाची कमतरता टाळण्यासाठी करावयाच्या उपाययोजना यांची माहिती त्यांनी दिली. तसेच महिलांमध्ये वाढणाऱ्या कॅन्सरचे प्रमाण व त्यापासून प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे उद्भवणाऱ्या मानसिक समस्या व अनावश्यक आकर्षणातून निर्माण होणारे धोके यावरही त्यांनी प्रकाश टाकला. मुलांशी मैत्री करताना स्वतःच्या मर्यादा ओळखणे, 'गुड टच-बॅड टच' यातील फरक समजून घेणे व कोणत्याही प्रकारच्या छळाला न घाबरता आवाज उठविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शारीरिक बदलांकडे दुर्लक्ष न करता शास्त्रीय माहिती घ्यावी व आत्मसन्मान जपूनच सोशल मीडियाचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

सखी सावित्री व विशाखा समितीच्या माध्यमातून किशोरवयीन मुलींना सुरक्षित व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. भुयार यांनी विद्यालयाचे कौतुक केले. कार्यक्रमास समितीच्या पालक सदस्यांची लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन सहायक शिक्षिका अर्चना गावंडे (पखाले) यांनी केले, तर आभार सहायक शिक्षिका कीर्ती कोष्टवार यांनी मानले. शिक्षिका व विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने कार्यक्रम यशस्वी ठरला.

## २१ शिक्षकांना भाऊसाहेब माने आदर्श शिक्षक पुरस्कार

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**उमरखेड :** पंचायत समिती उमरखेड यांच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त दरवर्षी दिला जाणारा "स्व. भाऊसाहेब माने आदर्श शिक्षक पुरस्कार" सन २०२५ साठी तालुक्यातील उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करणाऱ्या २१ शिक्षकांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा उमरखेड येथील पंचायत समिती सभागृहात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी किरण कोळपे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विजयराव माने, गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड, सेवानिवृत्त नायब तहसीलदार शिंदे तसेच तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. विजयराव माने यांनी स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा वाहणारे, पंचायत समिती उमरखेडचे पहिले सभापती, सलग दोन वेळा आमदार राहिलेले सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब माने यांच्या कार्याचा गौरव केला. १९३२ मध्ये शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात करून समाजजागृतीचे कार्य करणाऱ्या भाऊसाहेबांनी हैदराबाद मुक्ती संग्रामातील सहभागामुळे राष्ट्रहितासाठी आपली शिक्षकीय सेवा त्यागून पूर्णवेळ समाजकार्य स्वीकारले. शिक्षण, सहकार व सामाजिक क्षेत्रातील त्यांचे अतुलनीय योगदान लक्षात घेता त्यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार अधिक प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात गटविकास अधिकारी किरण कोळपे यांनी सन्मानित शिक्षकांनी आपल्या कार्यातून शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या कार्यातून भावी पिढी घडेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी यशवंत कदम, वर्षा गुट्टे व रविंद्र चव्हाण यांनी सत्काराला उत्तर दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विस्तार अधिकारी संतोष घुगे यांनी केले, सूत्रसंचालन डॉ. विनय चव्हाण यांनी केले तर आभार केंद्रप्रमुख आनंद देशमुख यांनी मानले. ***सन्मानित शिक्षक*** : तुळशीराम भरकाडे (टेंभुरदरा), अशोक मुकावर (विडुळ), यशवंत कदम (कारखेड), चिन्नू निरजंने (माणकेश्वर), रंजना मुनेश्वर (सुकळी), विजयकुमार कोकरे (बिटरगाव), जयराम आसोले (भवानी), वर्षाताई गुट्टे (कोर्टा), मारुती कोकाटे (गाडी), दुर्गा पातंगवार (पोफळी), भारत चौरे (दत्तनगर), शीतल ठाकरे (मुळावा), प्रताप मुंजाळ (शंकरवाडी), रमेश विणकरे (चिंचोली स.), विनोद नरवाडे (बिटरगाव नवी आबादी), केंद्रप्रमुख परसराम कर्णवाड, केंद्रप्रमुख अरुण बुरकुले, रविंद्र चव्हाण, दिव्यांग शिक्षक विष्णू धुळे, छाया चाकोरे (नागापूर).

"आदर्श शिक्षकांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन समाजातील आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जाणारी व परिवर्तन घडविणारी आदर्श पिढी घडावी."-डॉ. विजय माने

## जि. प. शेष फंडातील पंचायत समितीचे काम निकृष्ट दर्जाचे

प्रतिनिधी २३ डिसेंबर




**उमरखेड :** जिल्हा परिषद शेष फंडातून उमरखेड पंचायत समितीला सुमारे सहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून या निधीतून पंचायत समिती इमारतीवरील तीन पत्र्यांची कामे सुरू आहेत. मात्र ही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे ज्या कार्यालयात गटविकास अधिकारी स्वतः बसतात, त्याच ठिकाणी ही कामे सुरू असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे कानाडोळा केल्याचे चित्र दिसून येत आहे.

पत्रकारांनी पाहणी केली असता सदर तीन पत्र्यांची जाडी अंदाजपत्रकानुसार नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. तसेच नियमानुसार खाली लोखंडी अँगल टाकणे अपेक्षित असताना कोणतेही अँगल न टाकता जुन्याच लाकडी राफ्टरचा वापर करून काम उरकविण्यात येत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे हे काम बोगस व निकृष्ट दर्जाचे असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. या कामांमध्ये ठेकेदार व संबंधित अधिकारी संगनमताने ठाकूरमाठूर पद्धतीने काम करून शासकीय निधी लाटण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे. निकृष्ट दर्जाची कामे असूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने पंचायत समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सदर कामांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन गुणनियंत्रकामार्फत सखोल चौकशी करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदाराचे देयक रोखावे, अशी जोरदार मागणी होत आहे. जर वेळेत कारवाई झाली नाही तर याबाबत तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही स्थानिकांकडून देण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५






## शासकीय आदेशाला हरताळ, पैशासाठी बदलला काळ...

# ७ च्या आत, विद्यार्थी शाळेच्या दारात !

## * कडाक्याच्या थंडीतही ९ वाजता ऐवजी ७ वाजताच उघडतात अनेक शाळा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

राज्यात थंडीचा पारा १० अंशाच्या खाली आला आहे. राज्यशासनाने चिमूकल्यांच्या शारीरिक व मानसीक वाढ होण्यासाठी पहिले ते चौथ्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची झोप पूर्ण व्हावी यासाठी हे वर्ग सकाळी नऊ वाजल्यापासून किंवा त्यानंतर सुरू करण्यात यावे असे आदेश शिक्षण विभागाकडून देण्यात आले होते. मात्र या आदेशाला शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवसापासूनच काही शाळांनी केराची टोपली दाखविली आहे. आतातर कडाक्याच्या थंडीतही चिमूकल्यांना ७ च्या आत शाळेच्या दारात जावे लागत आहे.



वाशिमच्या सर्व शाळा सुरू झाल्यापासून यातील काही शाळा या सकाळी ७:३० वाजल्यापासूनच भरविण्यात येत आहे. आतातर कडाक्याची थंडीच आहे. तरीही काही शाळा या सकाळी ९ वाजण्यापूर्वीच भरविल्या जात आहेत. त्यामुळे ज्या शाळांनी शिक्षण विभागाचे आदेश मानले नाहीत. त्या शाळांवर आता शिक्षण विभाग काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या कार्यालयामार्फत राज्यातील विविध शाळांच्या वेळा विचारात घेऊन शाळांची वेळ बदलण्याविषयी अभ्यास करण्यात आले. सदर अभ्यास करण्यासाठी राज्यातील शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण प्रेमी, पालक, तसेच प्रशासनातील अधिकारी यांचे देखील मत नोंदविण्यासाठी गुगल लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. गुगल लिंक वरील प्रतिक्रिया व विविध शिक्षण तज्ज्ञ , शिक्षण प्रेमी व पालक यांच्याशी चर्चा केली असता, प्राधान्याने काही महत्वाच्या बाबी समोर आल्या आहेत.राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळांपैकी काही शाळा विशेषतः खाजगी शाळा भरण्याच्या वेळा या साधारणपणे सकाळी ७ नंतर असल्याचे दिसून येते. आधुनिक युगातील बदलेली जीवनशैली, मनोरंजनाची विविध साधने, शहरातील उशिरापर्यंत सुरु असलेल्या ध्वनिप्रदूषण उदा. वाहनांचा आवाज, विविध कार्यक्रमांच्या अनुषंगाने वाजविले जाणारे कर्कश संगीत अशा अनेकविविध कारणांमुळे विद्यार्थी रात्री उशिराने झोपत आहेत .तसेच सकाळी लवकर शाळा असल्याने त्यांची झोप पूर्ण होत नाही. ज्याचा नकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होताना दिसत आहे. पालकांच्या मते पाल्याची झोप ही सकाळी पूर्ण न झाल्याने शाळेत जाण्यास लवकर उठण्यासाठी ते तयार होत नसतात त्यातच कडाक्याची थंडी सुरू आहे. सकाळी लवकर शाळा असल्याने विद्यार्थ्यांची रात्रीची झोप पूर्ण होत नसल्याने ते दिवसभर आळसलेले दिसून येतात. त्यामुळे बऱ्याचदा अभ्यासासाठी आवश्यक असणारा उत्साह कमी झालेला दिसून येतो. ज्याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या शिक्षणावर होतो. मोसमी हवामान, विशेषतः हिवाळा व पावसाळा या ऋतू मध्ये सकाळी लवकर उठून शाळेत जाणे. पावसामुळे व थंडी मुळे अनेक विद्यार्थ्यांना त्रास होते. त्यामुळे ते अनेकवेळा आजारी पडतात. सकाळी पाल्याला लवकर तयार करणे, जेवणाचा डबा तयार करणे आणि पाल्याला वेळेत शाळेत सोडणे यामुळे देखील अनेक पालकांची धावपळ होते.त्यासह सकाळी लवकर भरणाऱ्या शाळेतील विद्यार्थ्यांना बस व व्हॅन द्वारे शाळेत नेतांना रस्त्यावरील धुके, पाऊस यामुळेही अडचणी निर्माण होतात. त्यामुळे शिक्षण विभागाने या सर्व अडचणी समजून राज्यातील इयत्ता पहिली ते चौथ्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा भरण्याची वेळ सकाळी ९ किंवा ९ नंतर केली आहे.

परंतु वाशीम शहरातील काही शाळा मनमानी करत सकाळी ७:३० किंवा ९ वाजण्यापूर्वीच भरविले जात आहे. शिक्षण विभागाकडून वेळेचे बंधन दिल्यावरही पहिल्याच दिवशी या आदेशाला केराची टोपली दाखविण्यात आली आहे. त्यामुळे आता शिक्षण विभाग वेळे आधी वर्ग भरविणाऱ्या शाळांवर काय कारवाई करतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### काय म्हणतो शासकीय नियम?

राज्यातील सर्व शाळा पहिली ते इयत्ता ४ थी पर्यंतचे वर्ग सकाळी ९ किंवा ९ नंतर भरविण्याबाबत शिक्षण विभागाकडून आदेश देण्यात आले होते. त्याचे पालन करणे बंधनकारक असल्याचे पत्रात सांगतिले गेले आहे. ज्या शाळा सूचनाचे पालन करणार नाही अश्या शाळांवर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. मात्र तरी वाशीम शहराच्या इयत्ता पहिली ते चौथी वर्गाच्या काही शाळा या आज ९ वाजण्याआधी भरविण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षण विभागाकडून यांना काही वेगळे नियम आले आहेत का? असा प्रश्न पालकांमधून विचारला जात आहे.

### चिमूकल्याच्या शाळा १० नंतर सुरू करा

शहरातील व ग्रामीण भागातील लहान मुलांचे शाळा वर्ग पुढील तीन महिन्याकरिता १० नंतर सुरू करा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. निवेदनानुसार लहान मुलांना शाळेकरिता कडाक्याच्या थंडीतच पाच वाजता पासून शाळेची तयारी करावी लागते. ७ वाजता शाळा सुरू होतात. त्यामुळे त्यांच्या झोपवर व आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे लहान मुलांच्या शाळा १० नंतर सुरू करा अशी मागणी सुभाष देवढे पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## थोडक्यात

### वरूणकुमार नरेंद्र लोहिया यांना आचार्य पदवी प्रदान




●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

स्थानिक महिला ऊत्कर्ष प्रतिष्ठान कंपनी सेक्शन ८, रिसोड द्वारा संचालित स्वर्गवासी पुंडलिकराव गवळी कला व विज्ञान महाविद्यालय शिरपूर (जैन) येथे कार्यरत असलेले प्राणीशास्त्र विषयाचे सहायक प्राध्यापक वरूणकुमार नरेंद्र लोहिया यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ने प्राणीशास्त्र या विषयामध्ये आचार्य पदवी प्रदान केली आहे. लोहिया यांनी यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय मंगरूळपीर येथील प्राणिशास्त्र विषय चे प्राध्यापक व पीएच. डी. गाईड डॉ अनंत हरीभाऊ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'Diversity of Beetles (Family Curculionidae) and their impact on Agricultural Crops in Washim District' या विषयावर प्राणीशास्त्र विभाग व पीएच. डी. संशोधन केंद्र आर ए महाविद्यालय, वाशीम येथे संशोधन केले. या संशोधनात त्यांचे वडील नरेंद्र लोहिया, आई पुष्पा लोहिया व पत्नी प्रियंका यांचे विशेष सहकार्य मिळाले. या संशोधनासाठी स्वर्गवासी पुंडलिकराव गवळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुधीर खाडे, आर ए महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ओमप्रकाश झंवर व यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राहुल एन सुर्वे यांनी कौतुक केले आहे.

## कागदोपत्री वृक्षारोपण

## रोपवाटीकेत भ्रष्टाचार, अधिकारी लाचार !



### लाभार्थी व अधिकारी जगले, वृक्ष नाही लागले

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

रोजगार हमीच्या १०० कोटीच्या घोटाळ्यानंतरही मालेगाव तालुक्यातील घोटाळ्याचे सत्र थांबता थांबेना तालुक्यात रोजगार हमी अंतर्गत देण्यात आलेल्या रोपवाटीकाच कागदोपत्री असल्याचे सिध्द झाले आहे. रोपवाटीकेतील वृक्ष गायब असून त्यानंतर रोपवाटीकेतील वृक्षांवर राबविण्यात येणारी वृक्षारोपण योजना कुठे आहे साहेब असा प्रश्न पडला आहे. भ्रष्टाचारी दक्ष असले तरी त्यांनी काहीच न करता ४५ लक्ष रूपये काढल्याचा प्रकार समोर आला आहे.

#### वाशीमनंतर मालेगावच्या रोपवाटीका गायब...

मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने रोजगार हमी योजनेअंतर्गत वाशीम तालुक्यात १४ रोपवाटीका कागदोपत्री असल्याचे प्रकरण सिटी न्युज सुपरफास्टने २०२२ मध्ये वृत्त मालिका प्रकाशित करून उघड केले होते. या भ्रष्टअधिकाऱ्याने चौकशी मॅनेज केली होती. जिओ टॅगवर रोपवाटीकेत एकही वृक्ष नसल्याचे पुरावे सिटी न्युज सुपरफास्टकडे उपलब्ध आहे. त्यानंतर यामधील भ्रष्ट तांत्रीक अधिकाऱ्याला लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाच स्वीकारतांना अटक केली. यावरून रोपवाटीकेसह इतरही विभागात भ्रष्टाचार झाल्याचे सिध्द झाले. मालेगाव तालुक्यातही रोपवाटीका गायब झाल्याचा प्रकार उघडकिस आला आहे .रोपवाटीकेतीच वृक्ष गायब झाल्याने वृक्षारोपण कुठे झाले साहेब असा सवाल नागरिक करीत आहेत.

वाशीम तालुक्यात कागदोपत्री रोपवाटीका व न झालेल्या वृक्षारोपणवर कोट्यवधीचा घोटाळा सिटी न्युज सुपरफास्टने उघड केला होता. आता मालेगाव तालुक्यात अस्तित्वात नसलेल्या चार रोपवाटिकांचे कुशलचे देयक काढण्यात आले असल्याचे माहिती आहे, सदर रोपवाटिका ह्या एसआयटी (विशेष चौकशी समिती) चौकशीत समाविष्ट होत्या, चौकशीने केलेल्या चौकशीमध्ये काही गंभीर बाबी समोर आल्याने सदर रोपवाटिकांचे देयक हे सन २०१८ पासून प्रलंबित होते, मात्र रोजगार हमी योजनेच्या घोटाळ्यात माहीर असलेल्या पंचायत समिती मालेगाव यांना यातूनही पर्याय काढून अस्तित्वात नसलेल्या व यासाठी चौकशीतगंभीर बाबी समोर आलेल्या रोपवाटिकांचे सुमारे ४५ लक्ष रुपये देयक काढले आहे, यामध्ये 'अर्ध्यात आम्ही अर्ध्यात तुम्ही' अशी डील झाल्याची माहिती समोर येत आहे, सदर डील ही रोहयो विभाग प.स.मालेगाव मधील 'दीपक' ने केल्याचे सिद्ध होत आहे, दीपक ने सदर प्रकरणात अर्थपूर्ण 'सावळा' गोंधळ घातल्याचे पुरावे सिटी न्यूज कडे आहेत, याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण चौकशीचे आदेश देऊन सदर घोटाळा बाहेर काढावा आणि दीपक चे कॉल डिटेल्स काढावे व चौकशी मद्ये दोषी आढळून येणाऱ्या बिडीओ व सीडीओ यांना तत्काळ निंलबित करावे अशी जनतेतून मागणी होत आहे.




संताजी महाराजांचा जयंती महोत्सव...

### गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

समस्त तेली समाज बहुउद्देशीय संघटनेच्या वतीने कारंजा येथे तेली समाजाचे दैवत संत शिरोमणी श्री.संताजी जगनाडे महाराज यांचा जयंती महोत्सव व तेली समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.महेश भवन येथे गुरुवार २५ डिसेंबर रोजी सकाळी ११:०० वाजता आयोजित या सोहळ्याला उद्घाटक म्हणून महाराष्ट्रा राज्याचे महसूल मंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे हे उपस्थित असतील.माजी खासदार तथा महाराष्ट्र प्रा.तैलिक महासभेचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्याला विशेष अतिथी म्हणून आ.श्रीमती सईताई डहाके,मा.अमोल पाटणकर मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे उपसचिव,मा.कैलास देवरे उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कारंजा,मा.आ.बाळासाहेब मांगुळकर आमदार यवतमाळ हे उपस्थित राहणार आहे. मयूर गजानन तायडे क्विक किंगडम क्रिकेट



अकॅडमी,गजानन पांडुरंग वाघ ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हे या सोहळ्याला उपस्थित असणार आहेत. दरम्यान सर्व तेली समाज बांधवांनी या सोहळ्याला बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक कारंजा येथील समस्त तेली समाज बहुउद्देशीय संघटनेचे अध्यक्ष किरण रामभाऊ क्षार,उपाध्यक्ष अतुल गुल्हाने,उपाध्यक्ष अतुल ढोरे,सचिव सुनिल दहापुते,सहसचिव संदीप गढवाले,कोषाध्यक्ष विनय गुल्हाने, सदस्य प्रविण राठोड,गजानन झंझाट, अनिल सुड़के सदस्य प्रशांत बिजवे,बाबुराव ना.सरोदे,किशोर पाठे सतीश क्षीरसागर दिपक गोदे,गणेश गुल्हाने व सोहळ्याचे अन्नदाते गजानन ना.गढवाले, राजेश ना गढवाले,तुषार वि.गढवाले यांनी केले आहे.

## अनेकांना घडवून स्वत:न घडणारे 'बाबा'

**२४ डिसेंबर माझ्या बाबांचा वाढदिवस, बाबा म्हणजे माझे मोठे काका माजी सरपंच अशोकराव आनंदराव देशमुख करर्डेकर परिवार मोठा असूनही परिवारासोबत अनेकांना घडविण्याची किमया त्यांनी केली. तिही स्वत: न घडता निस्वार्थपणे आनंदाने!**

वडीलोपार्जित शेकडो एकर शेती असल्यामुळे सरकारी नोकरी नाकारली. कमी वयात वडीलाचे निधन झाले सहा भाऊ चार बहिनी सर्वानी एका जिवानी संयुक्त कुटुंब पध्दत स्वीकारली. अति चागुलपना, व नेहमी मदतीस तत्पर असा आमचा मोठा परिवार ! त्यांनी व्यव्हाराची जबाबदारी माझे वडील प्रकाशराव यांच्या वर सोपविली. त्यांनीही सर्वांना विश्वासात घेवून योग्य रित्या सांभाळली. दोघा भावंडानी गावात मागेल त्याला मदत केली. १९७७ च्या काळात स्वत:हाचा मोठा ट्रक मित्राला ठेकेदारीसाठी दिला. शिवाय १९७९ भावाच्या लग्नाच्या हुडांची रक्कमही दिली. रिसोड येथील १९६० मधील एकमेव सिमेंट कॉक्रिटची हवेली मैत्रीसाठी विकून टाकली. प्लॉटही नाममात्र किंमतीत मित्राला दिला. आणि मित्राला मोठे केले. या शिवाय तामझाम मोठा असल्याने अनेक गरजू शेतकऱ्यांना शेताची पेरणीसाठी बैल गाडीसह आपल्या शेतातील गडीमानसेही देवून लहान शेतकऱ्यांना मोठे केले. ज्यांना राहण्यासाठी घर नव्हते ते आमच्या घरी म्हणजे वाड्यात झोपत होते. आमची गच्ची म्हणजे 'आनंद भवन' सर्वासाठी खुले होते. सर्व गावाच्या बैठकी इथेच होत होत्या. दिवसभर येणाऱ्या जाणाऱ्या साठी चहा आणि जेवन करण्यासाठी घरच्या महिलांनी कधीही कंटाळा केला नाही. दुसऱ्याना चहा पाजून जेवू घालण्यात किती आनंद मिळतो हे मी घरच्याकडून अनुभवले. समाजकारणासाठी कधीही न आवडणाऱ्या राजकारणात बाबांनी प्रवेश केला आणि सरपंच झाले. २५ ते ३० वर्ष नाममात्र सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष राहीले. तेही 'रबर स्टॅाप' म्हणून ! मित्रांनी सांगावे आणि बाबांनी करावे ऐवढेच ! अनेकांनी त्यांचा फक्त वापरच केला. हे त्यांना माहित असून त्यांनी कधीही मदत करणे सोडले नाही. हे विशेष. कारकीर्त सरपंचाची - सरपंचाची धुरा सांभाळतांना गावात अनेक समस्यांनी ग्रस्त होते. पिण्याच्या पाण्यासह रस्ते, विज, नाल्या अशा अनेक समस्या होत्या. त्या त्यांनी हळुहळु दुर केल्या. १ सिंचन तलाव - पाणी समस्या असल्याने हिवाळ्यातच पाणी टंचाई भासत असे. शेतातून पाणी आणावे लागत असे. यासाठी माजी मंत्री, माजी खासदार अनंतरावजी देशमुख यांना भेटून गावासाठी सिंचन तलाव मंजुर करून घेतला. यासाठी गावातील अनेक मंडळींनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या सरपंचाच्या कारकीर्ततच सिंचन तलाव झाला. २. कृषी विज्ञान केंद्र - माजी खासदार अनंतरावजी देशमुख यांनी शेतकऱ्यांसाठी कृषी विज्ञान केंद्र आणण्याचे ठरविले. सर्वप्रथम तत्कालीन सरपंच अशोकराव देशमुख यांनी ते करड्यात



आणण्यासाठी ५५ एकर जमीनीचा ठराव शेतातून दिला. आणि करड्याला उभारणी करण्याची विनंती केली.

यावेळी अनेकजण त्यांच्या सोबत होते. अनंतराव भाऊमुळेच जिल्ह्यातील नव्हे राज्यातील शेतकरी याचा लाभ घेत आहेत. ३.नळयोजना - गावात अगोदर नळयोजना होती. पण बाबांनी स्वत:ची गडी मानसे लावून नळयोजना सुरू ठेवली होती. कारण नळयोजनेची ७० टक्के पाईप लाईन आमच्या शेतातून गेलेली होती.

त्याची देखभाल दुरूस्ती काका सहीत गडी मानसे करीत होती. त्यामुळे अनेक वर्ष लोकांना नळाद्वारे पाणी पुरवठा करू शकले. ४ जनावरांसाठी पाणी - सिंचन तलाव होण्याअगोदर मानसालाच पिण्यासाठी पाणी मिळत नसेल तर जनावरांना कसे मिळणार आमच्या शेतात विहीरी जवळ आजोबानी एक हौद बांधलेला आहे. तेथे गावातील जनावरे पाणी पिण्यासाठी येतात. हे दुर असल्याने बाबांनी गावातील पाण्याच्या टाकीजवळ मोठा हौद बांधून २४ तास जनावरांसाठी पाणी पिण्याची व्यवस्था केली होती. ५. आर.सी.एफ.ला गाव दत्तक - शेतकऱ्यांना विविध योजनेचा लाभ मिळण्यासाठी ९० मध्ये आर.सी.एफ.ला आर.सी.एफ.ला गाव दत्तक देवून आर.सी.एफ. भवन उभारले. ६. पापड उद्योग - त्यावेळी महिलांना रोजगार मिळावा म्हणून पापड उद्योगाच्या इमारतीची उभारणी केली. ७. जनावरांसाठी कोंडवडा ८. अंगणवाडी - ९. पाण्याच्या टाकीखाली गोडावूनची उभारणे १०. विविध योजना - आज ज्या योजना शेतकऱ्यांना मिळत नाही त्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ त्यांनी शेतकऱ्यांसह सर्व सामान्यांना दिला. फळबाग योजनेतून बोर, आवळा, संत्री, यांची लागवड केली. स्वत:हून उभे राहून अनेकांच्या शेतात विहिरी खोदून घेतल्या. व निराधारांना घरकूल बांधून दिले. अशी अनेक कामे बाबांनी केली. कधीही त्याचा गाजावाजा केला नाही. श्रेय घेतले नाही. कित्येक गरीबांच्या लग्नाला मदत, दवाखाण्याला मदत, निराधाराला मदत केली. त्यांच्या बद्दल लिहायचे झाले तर अनेक पुस्तके कमी पडतील. हे मला माहित आहे. त्यांची काळानुसार प्रगती झाली नसेल. पण मनाची श्रिमंती कायम आहे. मी हे लिहले बाबाला आवडत नाही हे मला माहित आहे. तरी त्यांची शमा माघून लिहीतो. माझ्या आक्रमक पणामुळे ते नाराज होतात पण तेच मला प्रेरणा देतात. त्यांच्यामुळेच आज मी कोणाला कोणतीही मदत करू शकतो.

आनंददाई 'आनंद भवन' - आमच्या आनंददाई 'आनंद भवनांत' मी लहानाचा मोठा झालो. जडण घडणीत आनंद भवाचा मोठा वाटा आहे. त्यांच्या सोबत बाबाचा ! आनंद भवन संपूर्ण गावाचे बैठकीचे ठिकाण वजा ग्रामपंचायातच ! अनेक जण इथेच मोठी झाली. सर्वात मोठे म्हणजे आमचा एवढा मोठा परिवार एकसंघ, निरव्यसनी, मनमिळावू अति चागुलपणा टिकून ठेवण्यात बाबांसह आनंद भवनाचा मोठा वाटा आहे. काळानुसार जरी प्रगती कमी झाली असेल पण आमच्या परिवारातील प्रत्येकाची मनाची श्रिमंती कायम आहे. पैसा पेक्षा आनंद भवनामुळे बाबांमुळे आमचा परिवार आनंददाई झाला आहे. सर्वांना आनंददाई करणाऱ्या बाबांना वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा !

**- आतिष देशमुख**

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

## एकलव्य इंग्रजी निवासी शाळेत प्रवेशासाठी अर्ज करावा

**अकोला:** आदिवासी विकास विभागाच्या इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य निवासी शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रवेशासाठी परीक्षा दि. १ मार्च २०२६ रोजी होणार आहे.

# अकोला शहराचे बकालपण दूर करण्यासाठीच राजकारणात येण्याचा निर्णय- आर्किटेक्ट सोहेल खान

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** आज अकोला शहरातील पोलीस लॉन जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय पोलीस वसाहत आदींचे कार्य ज्यांच्या दूरदृष्टीने पार पडले व अकोला शहराच्या वैभवात भर पडली अशा आर्किटेक्ट सोहेल खान यांची ओळख सर्वांनाच आहे. शहरातील नायगाव परिसराचे प्रतिनिधित्व करण्याची त्यांची खूप इच्छा आहे. पुणे येथे आर्किटेक ची पदवी घेतल्यानंतर त्यांनी पुढील आर्किटेक ची मास्टर पदवी ऑस्ट्रेलियात घेतल्यानंतर ऑस्ट्रेलियात काही काळ इंटरनॅशनल कंपनीत सेवा सुद्धा दिली परंतु ज्यांना भूमीचे काहीतरी देणे लागते याचा विचार करून ते परत भारतात परतले अकोल्यात आल्यानंतर त्यांनी स्थिर स्थावर झाल्यानंतर शहरातील अत्यंत सुंदर अशा पोलीस लॉन च्या निर्मितीचा आराखडा त्यांनी एकही पैसा न घेता करून दिला त्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाची भव्य इमारत पोलीस वसाहतीचे निर्माण कार्य तसेच अन्य प्रोजेक्ट करून त्यांनी एक एक लक्ष साध्य केले आता सर्व काही मिळाल्यानंतर आपल्या नायगाव परिसराचा तसेच अकोला शहराच्या विकासासाठी आणखी काय करता येईल यासाठी त्यांनी राजकारणात येण्याचा निर्णय घेतला आहे यंदाची निवडणूक ते नायगाव परिसरातून लढणार आहेत त्यासाठी त्यांनी पूर्वीपासूनच नायगाव परिसरात आधार कार्ड राशन कार्ड तसेच नागरिकांच्या आरोग्यासाठी आरोग्य शिबिर आदींचे आयोजन केले आहे त्यांच्या मागे परिसरातील शेकडो युवकांची फौज आहे त्यांच्या मते नायगाव हा अकोला शहराचा भाग आहे हे कुठेच दिसून येत नाही. ना परिसरात ड्रेनेज सिस्टीम आहे, ना सुंदर बगीच्या, इतकेच नव्हे तर समाज भवन, किंवा मुलांना खेळण्यासाठी ग्राउंड आदींची कमतरता आहे. या प्रभागाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी यंदाची निवडणूक ते लढवणार आहेत. शहराचे लोकप्रिय आमदार साजिद खान पठाण यांच्या मागे लागून त्यांनी नायगाव परिसरातील समाज भवनासाठी भरघोस निधी मिळवला आहे, नुकतेच या समाजभावनाचे भूमिपूजन आमदार साजिद खान पठाण यांच्या शुभ हस्ते पार पडले. शहरात महेंद्र कल्याणकर तसेच चिंचोलीकर आयुक्त असताना त्यांनी शहर विकासाचा आराखडा तयार करून दिला होता त्यामुळेच आज शहरात




जे मोठ मोठे रोड व पूल बांधण्यात आले आहेत त्यामागे आर्किटेक्ट सोहेल खान यांचा मोठा हात आहे नायगाव परिसरात लोकांकडे कोणतेच आवश्यक कागदपत्रे नसल्याने त्यांना योजनांचा लाभ घेता येत नाही त्यामुळे या सर्वांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले शहराचा विकास समप्रमाणात झाला पाहिजे असे त्यांचे मत आहे शहरातील नायगाव परिसराची अत्यंत दुरावस्था झाली आहे या परिसराची तब्येत इतकी बिघडली आहे की आता या परिसराला साध्या डॉक्टरची नव्हे तर एमडी डॉक्टरची गरज असल्याचे त्यांनी सांगितले आज भारत स्वतंत्र होऊन एवढे वर्ष झाले तरी नागरिकांना पाणी रस्ते गटार आदी मूलभूत सुविधा साठी प्रतीक्षा करावी लागत आहे ही अत्यंत खेदाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले आज आपल्याकडे साजिद खान पठाण सारखा कर्तबगार आमदार आहे त्यांच्याकडे नुसती आयडिया जरी दिली तर हमखास रिझल्ट मिळतो असे त्यांचे म्हणणे आहे त्यामुळे नायगाव परिसराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठीच मी यंदा निवडणुकीला सामोरा जाणार आहे असेही मत त्यांनी व्यक्त केले आर आर सी न्यूज वर प्रसारित होणाऱ्या अकोला महापालिकेचे धुरंदर या कार्यक्रमात त्यांनी ही मुलाखत दिली आरआरसी न्यूज वर लवकरच या मुलाखतीचे प्रसारण होणार आहे.

# विदर्भ चेंबरच्या 'विटेक्स-२०२६' मैदानाचे भूमिपूजन



◆ २ जानेवारीपासून प्रदर्शनीचा शुभारंभ

**वैदर्भीय उद्योग क्षेत्रात ठरणार मैलाचा दगड !**
विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या अकोला जिल्हा शाखेच्यावतीने २ ते ५ जानेवारीपर्यंत गोरक्षण रोडवरील गोरक्षण संस्थेच्या मैदानात आयोजित 'विटेक्स-२०२६' प्रदर्शनी विदर्भाच्या औद्योगिक व व्यापारी विश्वात एक मैलाचा दगड ठरणार आहे. यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासाला नवी गती मिळणार असल्याचे चेम्बरतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला :** पश्चिम विदर्भाच्या उद्योग आणि व्यापार क्षेत्राला गती देण्याच्या उद्देशाने विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या वतीने २ ते ५ जानेवारीपर्यंत गोरक्षण रोडवरील गोरक्षण संस्थेच्या मैदानात आयोजित 'विटेक्स - २०२६' चे भूमिपूजन रविवारी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी विदर्भ चेंबरचे अध्यक्ष तथा प्रदर्शनीचे संयोजक निकेश गुप्ता, ऋची गुप्ता यांनी पूजा-अर्चना करून वैदिक मंत्रोच्चारात भूमिपूजन केले. चेंबरचे सचिव नीरव वोरा, वरिष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रूहाटिया, कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछूका, किरीट मंत्री राहुल मित्तल व प्रदर्शनीचे मुख्य प्रायोजक मार्वल ट्रिनिटी रिअल इस्टेट एलएलपीचे मधुर सुनील इनानी, जितेश संतोष हेडा, सह-प्रायोजक विठ्ठल ब्रँडचे शिवप्रकाश रूहाटिया यांच्यासह चेंबरचे माजी अध्यक्ष श्रीकिशन अग्रवाल, अशोक डालमिया, अशोक गुप्ता, रमाकांत खंडेलवाल प्रमुख उपस्थित होते.

या प्रदर्शनीचा उद्योजक, व्यापारी वनागरीकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या भूमिपूजन सोहळ्यात आयोजन समितीचे अॅड. सुभाषसिंह ठाकुर, आशीष अमीन, दिलीप खत्री, दीपाली देशपांडे, गुलशन कृपलानी, हरिश लाखानी, पायल सुनारीवाल, गिरिराज लखोटिया, मंगेश रघुवंशी, तुषार नारे, देवांग जैन, प्रताप ठाकुर, पायल वोरा, रविता शर्मा, लिना आर्या, संध्या कारिया, कृतिका गुप्ता, हर्षिता रघुवंशी तसेच शगुन इव्हेंटचे प्रेम अग्रवाल, कृष्णा शर्मा, मधुर खंडेलवाल, महेश मूंदड़ा, मनीष केडिया, नमन खंडेलवाल, नीलेश अग्रवाल, पंकज कोठारी, राहुल गोयनका, राजीव शर्मा, राजकुमार राजपाल, रामप्रकाश मिश्रा, ज्ञानप्रकाश खंडेलवाल, ओम अग्रवाल, ऋतिक अग्रवाल, रोहित केडिया, शैलेश आलमचंदानी, भूषण अग्रवाल, यश रोहित खंडेलवाल, सिंघानिया, केशव खंडेलवाल, रोहन जाटव यांच्यासह उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते व गणमान्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भटक्या श्वानांनी घेतला एका दिवसात पाच जणांना चावा

प्रतिनिधी २३ डिसेंबर

**अकोला:** येथील मलकापूरच्या प्रभाग क्रमाक १४ च्या एमआडीसी रस्ता आणि परिसरात वेगवेगळ्या घटनांमध्ये भटक्या श्वानांनी एकूण पाच जणांना दिवसभरात चावा घेतल्याची घटना घडली आहे. पालिकेकडून पालिका हद्दीतील भटके श्वान निर्बिजीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून उचलले जात नाहीत. तक्रार केली तरी त्याची दखल पालिकेच्या आरोग्य विभागाकडून घेतली जात नसल्याची तक्रारी भाजपचे राजेश वगारे यांनी केली असून, भटक्या श्वानांना महापालिकेत सोडणार असल्या इशारा दिला आहे. मलकापूरमध्ये एकाच दिवशी पाच जणांना भटक्या श्वानांनी चावा घेतला असून, काही लहान मुलांनाही भटक्या श्वानांनी चावा घेऊन त्यांना गंभीर जखमी केले आहे.

पालिकेच्या आरोग्य विभागावर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत शहकाटशहाच्या राजकारणात हा विभाग अडकला आहे. त्यामुळे रुग्ण सेवा, भटक्या श्वानांचा बंदोबस्त या महत्वपूर्ण विषयाकडे लक्ष देण्यास कोणाला वेळ नसल्याचे पालिकेत चित्र आहे. त्यामुळे शहरात भटक्या श्वानांची संख्या वाढली आहे असेही राजेश वगारे यांनी तक्रारीत म्हटले आहे.

भटका श्वान चावलेल्या एका जणाने सांगितले, मी दुपारचे घरात भोजन केले. इमारतीखाली येऊन दुचाकी सुरू करून निघण्याच्या प्रयत्नात होतो. तितक्यात वेगाने एक भटका श्वान माझ्या अंगावर आला. त्याला हुसकावत असतानाच त्याने जोराने माझ्या पायाला चावा घेतला. मी मोठ्याने ओरडायला लागलो. तेव्हा भटका श्वान तेथून पळून गेला. त्यानंतर या भटक्या श्वानाने मलकापूरच्या प्रभाग क्रमाक १४ च्या एमआडीसी रस्ता आणि परिसरात चार ते पाच जणांना चावा घेतला आहे. यामध्ये एका महिलेचा, एका लहान मुलाचा समावेश आहे.

**पालक, विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण**

शहरात अनेक शाळा आहेत. लहान मुले आपल्या पालकांसोबत पायी शाळत येजा करतात. श्वान चावण्याच्या या घटनांमुळे पालक, विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घर परिसरात एखादे लहान मूल खेळत असेल आणि अचानक भटक्या श्वानांनी त्या बालकावर हल्ला केला तर गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते, असे वगारे यांनी सांगितले. शहरातील भटके श्वान पकडून त्यांचे निर्बिजीकरण, नसबंदी करण्याची कामे करत होते. पण आता निर्बिजीकरण केंद्राचे काम पाहणाऱ्या नियंत्रक अधिकाऱ्याचे लक्ष नाही. शहरात भटके श्वान पकडण्याची मोहीम पालिकेकडून राबविली जात नाही. त्यामुळे हे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

# महानगर पालिका निवडणूक संदर्भात मनपा व पोलिस प्रशासनाची आढावा बैठक

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**अकोला :** २२ रोजी महानगर पालिका प्रशासन आणि पोलिस दलाच्या वतीने महानगर पालीका निवडणूक संदर्भात पोलिस अधीक्षक व मनपा आयुक्तांनी शहरातील इव्हीएम स्ट्रॉगरूम केंद्र तसेच नियोजित मतमोजणी केंद्र याठिकाणी भेट देवून पाहणी केली. तेथील नियोजन व सुरक्षा व्यवस्था याचा आढावा घेतला. शासकीय गोडावून खदान, जिजाऊ हॉल, मराठा मंगल कार्यालय, पोलिस वसाहत हॉल तसेच जिल्हा परिषद हॉल येथे पाहणी करण्यात आली.

त्यानंतर पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या विजय हॉल मध्ये दोन्ही विभागातर्फे संयुक्त सभा घेण्यात आली. मनपा आयुक्तांसह संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, सह निवडणूक निर्णय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील सर्व पोलीस स्टेशनचे ठाणे प्रभारी अधिकारी हजर होते. सभे मध्ये पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केलेल्या आवाहनानुसार आगामी महानगर पालिका निवडणुक संदर्भाने महानगर प्रशासन व पोलिस प्रशासनात प्रशासकिय समन्वय ठेवणे आवश्यक आहे. मनपा प्रशासनास आवश्यक सहकार्य तसेच पोलिस बंदोबस्त पुरविण्यात येईल असे सांगितले. मागील महानगरपालीका निवडणुकी मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यातील आरोपींविरुध्द प्रतिबंधक कार्यवाही करणे, आदर्श आचार संहीता लागु असल्याने परवाना शस्त्र धारक यांचेकडील शस्त्रे जमा करून घेणे या सह नामनिर्देशन फॉर्म दाखल केंद्र या एकुण ०६ ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवणे. त्याचप्रमाणे मतदान केंद्र, मतदान केंद्राबाहेरील बंदोबस्त तसेच पोलीस विभागातर्फे आढावा घेण्यात आलेल्या संवेदनशिल मतदान केंद्रावर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त नेमणे, स्ट्रॉगरूमचे ठिकाणी नियुक्त करावयाचा बंदोबस्त तसेच संपुर्ण मतदान व मतमोजणी प्रक्रियेसाठी अकोला जिल्हा पोलीस दलातर्फे एकंदरीत पोलीस बंदोबस्त तसेच बाहेरील होमगार्ड व एसआरपीएफ बंदोबस्त याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

# मलाबार गोल्ड अँड डायमंडस् तर्फे ब्राईडस् ऑफ इंडिया दागिन्यांचे प्रदर्शन

**विवाह सोहळ्यासाठी आकर्षक दागिने उपलब्ध**

प्रतिनिधी २३ डिसेंबर




**अकोला :** शुक्र अस्त असल्यामुळे सध्या मंगल कार्यांना ब्रेक लागला आहे. मात्र, दुसरीकडे जगप्रसिद्ध 'मालाबार गोल्ड अँड डायमंड्स'तर्फे आगामी विवाह सोहळ्यांसाठी 'ब्राईडस् ऑफ इंडिया' या विशेष विवाह आभूषण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

मलाबार गोल्ड अँड डायमंड्स हा एक नामांकित भारतीय ज्वेलरी समूह असून, ११ देशांमध्ये त्यांचे ३३० हून अधिक शोरूम्स आहेत. यामुळेच ही जगातील सर्वात मोठ्या ज्वेलरी रिटेल साखळींपैकी एक बनली आहे. सध्या शुक्र अस्त असल्याने शुभ कार्यांवर काहीशी स्थगिती असली तरी, फेब्रुवारी महिन्यापासून लग्नांची धामधूम पुन्हा सुरू होणार आहे. त्यापूर्वीच, प्रसिद्ध मालाबार गोल्ड अँड डायमंड्स प्रतिष्ठानमध्ये 'प्राईड ऑफ इंडिया' या दागिन्यांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात विवाह सोहळ्यासाठी आवश्यक असलेल्या शुद्ध सोन्याच्या दागिन्यांसह हिऱ्यांच्या दागिन्यांची अफाट श्रेणी पाहायला मिळणार आहे. हेवी मंगळसूत्र आणि लाँग मंगलसूत्र, डेली युज (२ ग्राम) आणि लाईटवेट मंगळसूत्र, मालाबार गोल्ड नेकलेस आणि बँगल्स सेट, सोन्याची साखळी, कानातले झुमके आणि बांगड्या, विविध डिझाईन्सच्या सोने व हिऱ्याच्या अंगठ्या, बिंदी, बाजूबंद, नथ आणि बरेच काही.. विशेष म्हणजे, या सर्व दागिन्यांच्या घडणावळीवर ३ टक्के सूट देखील मिळणार आहे. मग वाट कसली पाहताय आजच मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या 'प्राईड ऑफ इंडिया' प्रदर्शनाला भेट द्या आणि खरेदी करून तुमचा विवाह सोहळा अविस्मरणीय बनवा, असे आवाहन सर्व आभूषण प्रेमींना करण्यात येत आहे. मालाबार गोल्ड अँड डायमंड्स, रतनलाल प्लॉट, रघुवंशी मंगल कार्यालयाजवळ, अकोला येथे संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# शहर प्रमुख विवेक खारोडे यांचा राजीनामा



प्रतिनिधी २३ डिसेंबर

**तेल्हारा:** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तेल्हारा शहर प्रमुख विवेक प्रदीपराव खारोडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. यामुळे तालुक्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. खारोडे यांनी हा राजीनामा शिवसेना जिल्हाप्रमुख, अकोला यांच्याकडे सादर केला आहे. या पत्रात खारोडे यांनी स्पष्टपणे नमूद केले की, गेल्या अनेक वर्षांपासून ते शिवसेनेत प्रामाणिकपणे कार्यरत असताना पक्षाने त्यांच्यावर विश्वास ठेवून शहरप्रमुख पदाची जबाबदारी सोपवली. 'वैयक्तिक कारणांमुळे' पद सोडत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. पक्षातील सहकार्याबद्दल सहकारी, कार्यकर्ते आणि नेत्यांचे आभार मानताना खारोडे यांनी म्हटले आहे, ठपुढील काळातही शिवसेनेशी माझे नाते कायम राहील. खारोडे यांच्या अचानक राजीनाम्यामुळे शहरातील शिवसेनेच्या संघटनात्मक रचनेत मोठे बदल होण्याची शक्यता आहे. नवीन शहरप्रमुख कोण? पक्षांतर्गत वाद कायम राहतील का? या प्रश्नांनी राजकीय वातावरण तापले आहे.

# शहरातील सहा झोन मध्ये आजपासून नामांकन प्रक्रिया सुरू

प्रतिनिधी २३ डिसेंबर



**अकोला:** महापालिका निवडणुकीसाठी २३ डिसेंबर पासून नामांकन अर्ज घेऊन स्वीकारले जाणार आहेत. यासाठी इच्छुक उमेदवारांना सोयीचे व्हावे म्हणून सहा झोन मध्ये अर्ज स्वीकारले जाणार आहेत. मंगळवारी दुपार पर्यंत बहुतांश केंद्रावरून अर्ज नेण्यात आले. महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीला आता सुरुवात झाली आहे. मंगळवारपासून सहा ठिकाणी अर्ज दाखल करता येणार आहे. सहा ठिकाणी तीन तीन प्रभागाचे अर्ज स्विकार होतील. तर दोन ठिकाणी चार प्रभागांचे अर्ज स्विकारले जातील. महापालिकेने प्रभाग क्रमांक १, २ आणि ७ साठी राजकमल चौकातील सिध्दार्थ हॉल येथे अर्ज दाखल करण्याची सुविधा केली आहे. प्रभाग क्रमांक ३, ४, ५ आणि ६ साठी उपविभागीय अधिकारी दुसरा माळा येथे अर्ज स्वीकारले जातील. तर महापालिका प्रभाग क्रमांक ८, ९, १० आणि १७ प्रभागांसाठी जुने शहरातील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात अर्ज सादर करता येणार आहे. तर महापालिका प्रभाग क्रमांक ११, १२ आणि १८ प्रभागातील उमदेवारांनी बी.आर.हायस्कुल येथे अर्ज दाखल करावेत. तर नेहरू पार्क चौकातील सेंट्रल जकात नाका येथे प्रभाग क्रमांक १३, १४ आणि १५ चे उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. तर आदर्श कॉलनी तील शाळा क्रमांक १६ येथे प्रभाग क्रमांक १६, १९ आणि २० या प्रभागातील इच्छूक अर्ज करु शकतील.

# खिसमससाठी सजावटीच्या साहित्याने बाजारपेठ सजली

◆ खिसमस ट्री, सांजाक्लॉजचे पेहराव आकर्षण

प्रतिनिधी २३ डिसेंबर





**अकोला:** ख्रिश्चन धर्मियांच्या सर्वात मोठा ख्रिसमस अर्थात नाताळ सणाला अवघे तीन दिवस उरले आहेत. ख्रिसमसच्या अनुषंगाने शहरातील बेकरी, केक शॉप, चॉकलेट, ब्लॅक फॉरेस्ट, स्ट्रॉबेरी, कॉफी विथ क्रीम, पाइनॅपल अशा विविध फ्लेवर्सच्या कुकीज, पेस्ट्रीज आणि चॉकलेट्सने सजल्या आहेत.

शहरातील आठ आणि जिल्ह्यातील सुमारे ३० चर्चच्या बाहेर रोषणाई केली जात आहे. शहरातील एकमेव सुमारे दीडशे वर्षचा इतिहास असलेली ख्रिश्चन कॉलनी देखील ख्रिसमसच्या स्वागतासाठी सजू लागली आहे. गांधी रोडवरील दुकानांमध्ये सजवलेले ख्रिसमस ट्री, आकाशकंदील आणि सांजाक्लॉजचे छोटे- मोठे पेहराव सगळ्यांचे आकर्षण ठरत आहेत.

ख्रिसमस हा सण ख्रिश्चन बांधवांचा असला, तरी सर्वच धर्मीय उत्साहाने हा सण साजरा करतात. लहानांपासून थोरांपर्यंत सगळ्यांनाच 'ख्रिसमस ट्री'पासून ते सांताक्लॉज, खाद्यजत्रा आणि चर्चेतील रोषणाईबद्दल कुतूहल असते. ग्राहकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी मोठमोठ्या मॉल बरोबरच लहान दुकाने रोषणाईने उजळून निघतात. ख्रिसमसला अवघे तीन दिवस राहिल्याने शहर परिसरातील वातावरण सध्या बदलले आहे. ख्रिश्चन कॉलनीमध्ये दिव्यांच्या माळा आणि चांदण्यांनी लहान-मोठ्या गल्ल्या सजविल्या आहेत. येथील बाजारपेठांमध्ये ख्रिसमस ट्री सजविण्याचे अनेकविध प्रकार उपलब्ध असून, नागरिक हौस म्हणून या वस्तूंची खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत. ख्रिसमस आणि केक हे समीकरणच असल्याने नामवंत बेक-यांमध्ये केकचे विविध प्रकार दाखल झाले आहेत. भेट देण्यासाठी विविध आकारातील फ्लेवरमधील कुकीज आणि चॉकलेट्सही विक्रेत्यांनी उपलब्ध केली आहेत. रंगीबेरंगी चांदण्या, बेल्स, पताकांनी सजविलेली दुकाने, ख्रिसमस ट्रीवर लुकलुकणारे दिवे, सांताक्लॉजचा पेहराव सगळ्यांचे आकर्षण ठरत आहे. गांधी रोडवरील दुकानांमध्ये सांताक्लॉजची टोपी, पूर्ण पेहराव लहान मुलांचे लक्ष वेधत आहेत. ख्रिश्चन बांधवांच्या घरांना रंगरंगोटी झाली असून, आता येशूंच्या जन्माचा देखावा आणि ख्रिसमस ट्री सजविण्यासाठीच्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी होत आहे. विविध चर्चमध्ये सजावटीचा शेवटचा हात फिरवला जात होता. येत्या दोन दिवसांमध्ये बहुतांशी सर्वच चर्चेसवर रोषणाई करण्यात येईल.

# अविनाश परळीकर यांचे श्रींच्या जन्मोत्सवात कीर्तन



**अकोला:** शहरातील ख्यातनाम कीर्तनकार अविनाश परळीकर यांचे कारंजा येथील गुरू मंदिरात गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता संतांच्या अवताराचे रहस्य या विषयावर निरूपण तर आख्यान वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांचे ज्येष्ठ शिष्य योगिराज श्रीगोविंद महाराज पंडित, ग्वाल्हेर यांच्यावर होईल. हार्मोनियमवर डॉ. सुशील देशपांडे तर तबल्याची साथ धीरेंद्र गावंडे यांची राहील.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK